

# जागतिकीकरण आणि लोकसाहित्य

संपादक
प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ
प्रा. डॉ. दिलीप भिसे





Scanned with CamScanner

# जागतिकीकरण आणि लोकसाहित्य

संपादक

प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ     प्रा. डॉ. दिलीप भिसे

समीक्षा पब्लिकेशन

Scanned with CamScanner

२८. पशुपालक भटक्या जाती जमातीचे सामाजिक – सांस्कृतिक अनुबंध । १७९
– प्रा. डॉ. रामनाथ गंगाधर वाडे
२९. लोकसाहित्य : उद्गम, अर्थ व विकास । १८५
– वीणा विष्णू केरीकर
३०. स्त्रियांच्या लोकसाहित्याचे स्वरूप । १९१
– प्रा. विद्या चं. मांडवेकर
३१. लोककलावंतांच्या कलाविष्काराचे स्वरूप । १९७
– डॉ. सरला गोरे / सावकारे
३२. लोकसाहित्यातील पंजाबी स्त्री साहित्यिकांचे दर्शन । २०४
– कल्पना र. देवरे, प्रा. डॉ. प्रमोद गंगाधर आंबेकर
३३. लोकसंस्कृतीतील उपासक । २१४
– डॉ. शिवदास झेड. शिरसाठ, बाबासाहेब सखाराम माने
३४. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व । २१८
– डॉ. मोरे संगीता
३५. लोकसाहित्याच्या अभ्यासाची गरज । २२३
– प्रा. दिलीप भिसे, श्री. किशोर भगत
३६. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे समाज जीवनातील महत्त्व । २२७
– डॉ. राजाभाऊ बंकटराव भगत, डॉ. संजयकुमार हनुमंतराव जाधव
३७. लोकसाहित्य : स्वरूप, समस्या आणि भवितव्य । २३२
– संभाजी गौतम पटाईत
३८. लोकसाहित्याचे भवितव्य । २४१
– सुप्रिया गणपतराव गडलवाड
३९. लोकसाहित्याचे स्वरूप । २४५
– काजगुंडे हनुमंत महादेव
४०. लोकसाहित्य : उगम अर्थ व स्वरूप । २५०
– प्रा. दिलीप ज्ञा. भिसे, सतिश अनंता तुपसमिंद्रे
४१. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व । २५७
– अंजली विठ्ठलराव मुसांडे



Scanned with CamScanner

# लोकसाहित्याच्या अभ्यासाचे समाजजीवनातील महत्त्व

डॉ. राजाभाऊ बंकटराव भगत
डॉ. संजयकुमार हनुमंतराव जाधव
यशवंतराव चव्हाण महाविद्याल, अंबाजोगाई, जिल्हा बीड

**प्रस्तावना:**

लोकसाहित्य हे लोकमाणसाचा व समाज जीवनाचा सहज झालेला आविष्कार आहे. तसेच लोकसाहित्य हे अखिल मानव जातीचे जीवनदर्शन आहे. त्यामुळे समाज जीवनाचे हे एक अंग आहे. ज्या समाजाचे हे वाङ्मय आहे त्याच्या जीवनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. लोक साहित्य केवळ शब्दबद्ध वाङ्मय नसते तर समाजात प्रचलित असलेल्या परंपरागत रूढी, आचार, विचार, लोकविश्वास या सर्वांचा यात समावेश होतो. लोकसाहित्याद्वारे समाज जीवनाचा आविष्कार होत असतो. लोकसाहित्यामध्ये सांस्कृतिक मुल्याविषयीची विस्तृत माहिती आपणाला मिळते. वेगवेगळे सण, उत्सव, वृत्त, वैकल्ये याविषयी माहिती लोकसाहित्यातूनच आपणाला मिळत असते. हे साहित्य ग्रामीण भागातील चावडी, मंदिराचा ओटा यावर बसलेल्या वयोवृद्ध व्यक्ती एकत्रित येऊन त्यातून नव्या पिढीला गावाचा इतिहास, रितीरिवाज, परंपरा, संस्कार नव्या पिढीला शिकवले जातात. गावातील लोकभाषा कशी आहे? याची माहिती लोकसाहित्यातून मिळते. लोकसाहित्य विशारद दुर्गाबाई भागवत म्हणतात, लोक साहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे. संस्कृतीचे सातत्य आणि तिच्यात होणारे बदल यांचे निरीक्षण करायचे तर ते लोकसाहित्यातच करावे. मानव व त्याच्या स्वभोवतालची चराचर सृष्टी हिचे नाते लोक - साहित्याच्या अभ्यासानंतर विशेष लक्षात येते. जगातील कोणत्याही भूप्रदेशातील मानवाच्या निर्मितीपासून आजपर्यंतच्या त्याच्या परंपरा, श्रद्धा, विश्वास, आचार-विचार आणि त्यांचे कलाविष्कार समजून घ्यावयाचे झाल्यास लोकसाहित्याचाच अभ्यास करणे गरजेचे असते.

**लोकसाहित्याचा अर्थ व व्याख्या:**

लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा व लोक माणसाचा अविष्कार असतो. लोकमानस चित्र, शिल्प, गीत, कथा, नृत्य, नाट्य, म्हणी, उखाणे आणि लोकसंप्रदाय



Scanned with CamScanner

अशा विविध रूपाने अभिव्यक्त होत असते. थोडक्यात लोक जीवनाचे विविध पैलूच लोक साहित्यामध्ये अवतरत असतात आणि लोकसमूहाच्या इच्छा, आकांक्षा, सुख: दुखे, जीवनमूल्य यांचे लोकसमूहाला दर्शन घडत असते. लोकसाहित्य हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरेद्वारे हस्तांतरित होत असते. डॉ. ना. गो. नांदापुरकर यांच्यामते लोकवाङ्मय म्हणजे लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त झालेले जे वाङ्मय तेच लोकवाङ्मय होय. लोकसाहित्याचा कर्ता हा अज्ञात असतो. त्यामुळे या साहित्याचा कर्ता खऱ्या अर्थाने लोकच असतात. लोक समाजातील अज्ञात अशा व्यक्तींनी म्हणजेच लोकांनी तयार केलेले लोक भाषेतील लोकांच्या परंपरेबरोबर चालत आलेले वाङ्मय म्हणजेच लोकसाहित्य होय. या संदर्भात डॉ. प्रभाकर मांडे यांनी असे म्हटले आहे की, लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा म्हणजे लोकसाहित्य होय. लोकसाहित्य हे परंपरागत असते आणि लोक साहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. तसेच लोक साहित्याचा अर्थ स्पष्ट करताना पाश्चात्त्य विचारवंत विलियम बास्कम असे मत प्रतिपादित करतात की, लोकसाहित्य म्हणजे दैवत, कथा, अख्यायिका, लोककथा, म्हणी, कोडी आणि मौखिक माध्यमातून व्यक्त होणारे कलात्मक अविष्कार होय. त्यांच्या मते लोकसाहित्य  हे सुशिक्षित वा अशिक्षीत समाजात ही मौखिक शब्द रूपातच अस्तित्वात असते. उपरोक्त अभ्यासकांच्या मताचा आधार घेऊन लोकसाहित्याचा सर्व सामान्यतः अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतो, लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेले, लोकांबरोबर मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेले आणि लोक भाषेतुन व्यक्त होणारे साहित्य म्हणजे लोक साहित्य होय.

**लोकसाहित्याचे वैशिष्ट्ये:**

१. लोकसाहित्य हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक रूपात हस्तांतरित किंवा संक्रमित होत असते.

२. लोकसाहित्याचे लोककथा,  लोकगीत, म्हणी व लोकनाट्य असे अनेक प्रकार पडतात.

३. लोकसाहित्याचा कर्ता हा अज्ञात असतो. समाजातील अज्ञात व्यक्तीने त्याची रचना केलेली असते. मूळ निर्मिती व्यक्तीची असली तरी ती व्यक्तीची न राहता समूहाची बनते.

४. लोकसाहित्य हे अलिखित असते.

५. लोकसाहित्यातून मनोरंजन होते व त्यातून ज्ञानप्राप्तीही होते. तसेच विविध कलागुणांचे संक्रमण होते. त्याचबरोबर विविध कला प्रकारांचा अविष्कार लोकसहितत्यातून होतो.



Scanned with CamScanner

६. लोकसाहित्य हे कला आणि वाङ्मय यांचे स्रोत असते.

७. लोकसाहित्यातून लोकमानसाचा व समाज जीवनाचा आविष्कार होतो. तसेच हे साहित्य आदिम व ग्रामीण समाजाचे दर्शन घडविते.

८. लोकसाहित्यातून प्रथा, परंपरा, चालीरीती, जीवन जगण्याची पद्धती, संस्कार व सांस्कृतिक मूल्यांचे प्रकटीकरण होते.

**लोकसाहित्याचे समाज जीवनातील महत्त्व:**

देशाचे व समाजाचे प्राचीन रूप जाणण्यासाठी लोकसाहित्य हे एक महत्त्वाचे साधन असते. इतिहासाचे एक प्रतिबिंब म्हणून ही ते ओळखले जाते. लोकसाहित्यामध्ये ऐतिहासिक घटनांचे वर्णन सामान्य जनतेला समोर ठेऊन केले गेलेले असते. लोकगीत, लोक कथा आणि गाथा यामधुन स्थानिक इतिहास व्यक्त होत असतो. कुठल्याही प्रदेशाच्या स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी लोकसाहित्याचे महत्त्व फार असते. एवढेच नाही तर म्हणी, पोवाडे, मिथके, दंतकथा, लोककथा यामुळेही इतिहासाच्या अभ्यासाला पूरक असे हे साहित्य असते. त्याचबरोबर स्फूर्ती गीते, लोकगीते, ओव्या, मेळे, जलसे, कलापथके याद्वारे सुद्धा इतिहासाविषयी माहिती मिळते. मौखिक साधन म्हणून ही या लोक साहित्याचे महत्त्व असते. लोकसाहित्यातून प्राचीन काळातील राज्यव्यवस्था व प्रशासन व्यवस्थेविषयी सुद्धा माहिती मिळत असते. लोकसाहित्यातून पारंपारिक समाज जीवनाचे दर्शन घडत असते.

लोकसाहित्याद्वारे घडलेल्या घटनांचे पडसाद लोक जीवनावर उमटतात. लोकसाहित्याची निर्मिती ज्या समूहात होत असते, त्या समूहापासून त्याला वेगळे करता येत नाही. कारण की, लोकसाहित्य हे त्या लोक जीवनाचा एक अविभाज्य घटक असतो. लोकसाहित्यातून जे जीवन व्यक्त होत असते ते समाज उपयोगी असते. लोक साहित्याच्या या अभ्यासाला समग्र विचारधारेच्या संदर्भात खूपच महत्त्व असते. कारण त्याच्या मुळाशी असलेले विचार विश्व सामाजिक, सांस्कृतिक जीवनाच्या सातत्याला आधारभूत असते. त्याच्याशिवाय भूतकाळ व वर्तमानकाळ यांचा सांधा जोडता येत नाही. लोकसाहित्य ज्या समाजाच्या जीवनाचा आविष्कार असते. ते लोक आजही त्याला काल्पनिक समजत नाहीत. हे लक्षात घेतले पाहिजे.' लोकसाहित्यातून समाजाची काही तरी गरज पूर्ण होत असते. समाज जीवनाचे लोकसाहित्यातून एक प्रकारे दर्शनच होत असते. समाज जीवनाला आकार देण्याचे कार्य ही लोक साहित्यातूनच घडून येत असते. अशा साहित्याची निर्मिती ही सतत होत असते.

लोकसाहित्यामधून परंपरावर अधारित जीवन जगणाऱ्या ग्रामीण व शहरी भागामध्ये राहणाऱ्या लोकांच्या संस्कृती व समाज जीवनाचे चित्र उमटलेले असते.



Scanned with CamScanner

लोकसाहित्यातून जसे ग्रामीण जीवनाचे चित्र म्हटलेले दिसते. तसेच 'गाथासप्तशती' सारख्या ग्रंथातूनही दोन हजार वर्षांपूर्वीचा मराठी माणूस त्याच्या, महत्वकांक्षा, त्याची स्वप्न, त्याचे शृंगार जीवन व एकुणच तो जगत होता ते वास्तव रेखाटलेले आहे. लोक म्हणजे सामान्य जनता नाही, तर लोकसाहित्य या शब्दातील 'लोक' हे सामान्य जनतेपेक्षा पुष्कळच निराळे असतात. 'लोक' म्हणजे केवळ ग्रामीण'लोक' नव्हे तर खेड्यातले नगरात राहणारे असे 'लोक' की जे परंपरावर आधारित जीवन जगत असतात. 'लोक' म्हणजे एका वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडवणारा एक वर्ग असतो. प्रत्येक मनुष्याचे काही विश्वास, मुल्ये आणी विचारधारा असते. त्याच्याशी संबंधित काही आदर्श घालून दिलेली असतात. त्यातूनच त्याची जीवनदृष्टी निर्माण होत असते. लोकांच्या मुळाशी एक वेगळी विचारधारा असते. त्यातून विशिष्ट धारणा, सामाजिक कल्पना आणि लोकसाहित्य निर्माण होत असते. एकंदरीतच लोकसाहित्य हे आदिकाळापासून चालत आलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात घटक रूपाने असलेल्या लोकमाणसाची अभिव्यक्ती असते. डॉ. श्याम परमार यांच्या मते लोकसाहित्य हे एकसंध समाजजीवनाचे असते. साक्षर, निरिक्षर, ग्रामीण, शहरी या सर्व स्तरातील लोकजीवनाचा लोकसाहित्यात समावेश होतो.

माणसाच्या जीवनविषयक सवयीतून, रूढीतून, परंपरागत नृत्य, गीत इत्यादी कलांमधून लोकसंस्कृती प्रकट होत असते. लोकसाहित्य हे विविध रूप अपनी अपनी विशेषताओं से लोगों के मौखिक साहित्य के परिचारक हुए है। लोकगाथा, लोककथा, तथा लोकनाट्यही श्रेणी मे आने वाले लोक सुभाषितोंने अपने लघुस्वरूप के कारण अपने अस्तित्व को अक्षुण्ण रखा है[३]। लोकजीवन परंपरागत चालत आलेल्या कृती आणि उक्ती यामधून प्रकट होत असते. ज्या, कृती आणि उक्ती मधून लोक जीवनाचा अविष्कार होतो त्यालाच लोकसाहित्य असे म्हणतात.

मानवाला आपल्या पूर्वजांच्या लोकजीवन आणि संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी लोकसाहित्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. लोकसाहित्य के विविध अंगोद्वारा पूर्वजोंका विपुल ज्ञान हमारे सन्मुख उपस्थित होता हे और भावो या विचारों को स्त्रोत प्रवाहित रहता है। लोकसाहित्याच्या विविध माध्यमातून जसे खेळ, गीते, बडबड गीते, ओवीगीते, भुलाबाईची गाणी, गोंधळ्याची गाणी, वासुदेवाची गाणी, पांगुळाची गाणी, धनगर गीते, दहाकाची गाणी, आदीतुन नव्या पिढीला संस्कृतीची, लोकजीवनाची माहिती मिळते.



Scanned with CamScanner

सारांशः-

लोकजीवनाचा व्यापक दृष्टीने विचार केल्यास लोकजीवन आणि लोक साहित्य यांचे अभिनत्व असते असे लक्षात येते. लोकसाहित्य म्हणजे लोकांचे जीवन जगण्याची पद्धती असते. लोकजीवनाचा संदर्भ सोडून लोक साहित्याचा अभ्यास करणे अशक्य असते. लोक साहित्याच्या अभ्यासामध्ये परंपरागत लोक जीवनाचे अवशेष असल्यामुळे आधुनिक जगात वावरणाऱ्याना प्राचीन लोकजीवनाचा, लोक व्यवहार आणि लोकसंस्कृतीचा अभ्यास करता येतो. लोकसाहित्याच्या अभ्यासातूनच वर्तमान काळातील मानवाला जीवन जगण्यासाठी प्रेरणा मिळत असते.

संदर्भ सूची :


१. डॉ. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे अंत:प्रवाह, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, तिसरी आवृत्ती २००८ पृष्ठ क्र. १५३.
२. डॉ. मुलाटे वासुदेव, ग्रामीण साहित्यः चिंतन आणि चर्चा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. पहिली आवृत्ती, डिसेंबर २००५ पृष्ठ क्र. १५.
३. डॉ. सोनवणे शशिकांत, लोकसाहित्य, अभय प्रकाशन, कानपूर, प्रथम आवृत्ती २००८, पृष्ठ क्र. ३२.
४. कित्ता, पृष्ठ क्र. ३२.
५. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०२२.




Scanned with CamScanner

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 Impact Factor - 7.139 Indexed (SJIF)

February 2020 Special Issue- 22 Vol. 4

## The Role of Women in Global Development

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal, Dr.Aqueela Syed Gous

Scanned with CamScanner

Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

February 2020 Special Issue- 22 Vol. 4

# The Role of Women in Global Development

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal, Dr.Aqueela Syed Gous

Shaurya Publication, Latur



Scanned with CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 22 , Vol. 4 February 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

| | | |
|---|---|---|
| १८. | स्तंभ लेखन<br>प्रा.डॉ. गायकवाड वाय.जे. | 52 |
| 19. | जलसंधारण एक भौगोलीक अभ्यास<br>प्रा.डॉ.घोडके जे.व्ही. | 55 |
| २०. | महिला सक्षमीकरण : संवैधानिक तरतूदींचा राजकीय अभ्यास<br>प्रा.डॉ.हरिभाऊ पांडुरंग कदम | 57 |
| 21. | भारतीय राजकारणात अल्पसंख्यांकांचा सहभाग<br>डॉ.जोगदंड संजय पांडुरंग | 59 |
| २२. | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील डॉ. ॲनी बेझंट यांचे योगदान<br>प्रोफेसर–किशोरकुमार गव्हाणे | 61 |
| २३. | जलसंधारण मानवी अस्तित्वासाठी अत्यावश्यक<br>डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव | 64 |
| २४. | मानवी विकासाचे महत्त्व<br>डॉ. प्रकाश बाबुराव तितरे | 66 |
| २५. | आंतरराष्ट्रीय राजकारणात विश्व न्यायाची भूमिका<br>डॉ. प्रशांत भाऊसाहेब सोळंके | 70 |
| २६. | **भारतीय सिनेमातील स्त्री चित्रण**<br>**डॉ. राजेंद्र गोणारकर** | 72 |
| २७. | वृद्धाश्रमातील वृद्ध महिलांची सामाजिक स्थिती<br>प्रा. डॉ. सरोज आगलावे | 74 |
| २८. | प्रशासकिय सुधारणामध्ये संधटन व पध्दतीची भुमिका<br>प्रा.सौ.डॉ.सयद कुरेशाबी नजीरसाब | 79 |
| २९. | "भारतीय महिलांचा सामाजिक दर्जा आणि समस्याचे अध्ययन"<br>प्रा.डॉ.शेकोबा परशुराम ढोले | 82 |
| ३०. | ग्रंथालय आणि डिजिटल माध्यमे<br>प्रा.डॉ.व्ही.बी. माने | 86 |
| ३१. | नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या व उपाययोजना<br>डॉ. वंदना नामदेव बनकर | 89 |
| ३२. | शाश्वत पर्यावरण आणि विकास<br>प्रा.डॉ.देशमुख आर.के. | 93 |
| ३३. | भ्रष्टाचार प्रशासना समोरील एक व्यापक व गंभीर समस्या<br>डॉ.जाधव संजयकुमार हनुमंत | 96 |
| ३४. | प्रशासकीय सुधारणा-स्वरुप, आव्हाणे आणि उपाय योजना<br>प्रा.डॉ.सुधाकर एस.हांगे | 98 |
| ३५. | बालकांच्या व्यक्तीमत्त्व विकासात सामाजिकरणाची भूमिका<br>डॉ.विद्या खंडारे – गोवंदे | 100 |
| ३६. | कृषी आणि आर्थिक विकास<br>प्रा. डॉ. कागदे बी. बी. | 102 |
| ३७. | स्त्रीयांच्या सामाजिक समस्या आणि उपाय<br>प्रा. काचगुंडे मोतीराम दत्तात्रय | 105 |



Scanned with CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue 22, Vol. 4
February 2020

Peer Reviewed
SJIF

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# भ्रष्टाचार प्रशासना समोरील एक व्यापक व गंभीर समस्या

डॉ.जाधव संजयकुमार हनुमंत
लोकप्रशासन विभाग,यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

---

**प्रस्तावना :-**

भ्रष्टाचार ही एक जागतिक आणि परंपरागत स्वरुपाची समस्या आहे. भारतामध्ये राजकीय, प्रशासकीय आणि आर्थिक क्षेत्रातील भ्रष्टाचाराची प्रवृत्ती अगदी प्राचीन काळापासुन अस्तित्वात आहे. प्राचीन काळातील राज्यसत्येतील कर्मचाऱ्यापासून ते आधुनिक काळातील लोकशाही शासन प्रणालीमधील सरकारी कर्मचाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची समस्या अस्तित्वात आहे. कौटिल्याच्या मते "जीभेवर ठेवलेल्या मधाला न चाखणे जसे असंभव असते त्याचप्रमाणे सरकारी कर्मचाऱ्यांकडुन सार्वजनिक धनाचा दुरुपयोग न करणे देखील असंभव आहे. तसेच पाण्यामध्ये पोहणारा मासा कधी दोन थेंब पाणी पिईल हे कळत नाही त्याप्रमाणे सार्वजनिक धनाबाबत कर्मचारीवर्ग करतातछ. यावरुन स्पष्ट होते की, प्रशासकीय संघटनेमध्ये कार्य करणारी कर्मचारी सहज प्रवृत्तीने भ्रष्टाचार करतो. माणुस जन्माने भ्रष्ट नसतो तो सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती तसेच ईर्षा, अतृप्तईच्छा, हव्यास, दुर्बलता, लोभ, नैतिकता व मुल्यांचा ऱ्हास, आणि व्याभिचारी प्रवृत्ती श्रद्धा - सबुरीचा अभाव इत्यादी कारणामुळे भ्रष्ट आचरण करण्यास प्रवृत्त् होतो. मनुष्यातील सद्आचरण व नैतिकतेचा ऱ्हास झालेला असल्यानेच शासन आणि प्रशासनामध्ये भ्रष्टाचार फोफावलेला आहे. नीरद सी.चौधरी यांच्या मते "एखाद्या कारकुनापासून ते मंत्र्यापर्यंत अपवादात्मक स्वरुपातच असा एखादा व्यक्ती असेल की ज्याला कोणत्या ना कोणत्या प्रकारे पैशाव्दारे नियंत्रित केले जाऊ शकणार नाही". यावरुन स्पष्ट होते की, शासकीय कार्य करणे आणि करवुन घेण्यासाठी 'पैसे देणे व पैसे घेणे' हा शिष्टाचार बनलेला आहे. यामध्ये मंत्री, सचिवापासुन ते कनिष्ठ स्तरावर कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वजण सक्रिय असतात.

**राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार :-**

राजकीय नेता आणि प्रशासकांमधील अनैतिक युतीमुळे राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रातील भ्रष्टाचाराची समस्या अतीउग्र बनलेली आहे. राजकीय भ्रष्टाचार प्रशासकीय सहकार्याशिवाय संभव नाही. वाढता प्रशासकीय भ्रष्टाचार हा लोकसेवेची प्रतिष्ठा आणि प्रतिमेला धुळीस मिळवण्यासाठी सहाय्यक झालेला आहे. आज भ्रष्टाचार मानवी जीवनाचे अभिन्न अंग बनलेले आहे. गुन्नार मिरडल यांनी "भ्रष्टाचाराला दक्षिण पुर्व आशिया देशाची एक लोकरिती म्हटले आहे". आशिया खंडातीलच नव्हे तर संपुर्ण जगातील लोक भ्रष्टाचाराला एका लोकरुढीच्या स्वरुपात स्विकारत आहेत. भ्रष्टाचार करणे ही सहजप्रवृत्ती बनल्यामुळेच भारतामध्ये अनेक आर्थिक घोटाळे घडुन आलेली आहेत आणि दररोज नव नविन भ्रष्टाचाराची प्रकरणे उजेडात येत आहेत. उदा. बोफोर्स घोटाळा ६४ कोटी, युरिया घोटाळा १३३ कोटी, चारा घोटाळा ९५० कोटी, शेअर बाजार घोटाळा ४००० कोटी, सत्यम् घोटाळा ७००० कोटी, स्टॅम्प् पेपर घोटाळा ४३ हजार कोटी, कॉमनवेल्थ गेम्स घोटाळा ७० हजार कोटी, २ जी स्पेक्ट्रम घोटाळा १ लाख ६७ हजार कोटी, अन्न घोटाळा २ लाख कोटी (अंदाजे) आणि कोळसा खान वाटप घोटाळा १२ लाख कोटी रुपये. भ्रष्टाचार हा औद्योगिक व सामाजिक आर्थिक क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर घडुन येत आहे. याचाच परिणाम म्हणुन स्विस बँकेमध्ये हजारो भारतीयांनी पैसा लपवुन ठेवलेला आहे. स्विस बँकेच्या संचालकाच्या (डायरेक्टर) मते, "भारतीय गरीब आहेत परंतु भारत देश कधीच गरीब राहिलेला नाही." त्यांच्या मते भारतीयांचे जवळपास २८० लाख कोटी रुपये स्वीस बँकेमध्ये जमा आहेत. ही रक्कम् एवढी मोठी आहे की केंद्रसरकारला ३० वर्षाचे अंदाजपत्रक जनतेकडुन एकही रुपयाचा कर न घेता बनवता येईल. म्हणजेच ३० वर्षापर्यंत केंद्रशासनाकडुन विवध योजना कार्यक्रम राबविता येतील तसेच प्रशासकीय खर्च ही करता येईल. भ्रष्ट राजकीय नेते, नोकरशहा आणि टॅक्स चुकविणाऱ्या लोकांनी देशाला लुटले आहे. या भ्रष्टाचाराच्या प्रवृत्तीमुळेच जगातील भ्रष्टाचारी देशाच्या यादीमध्ये भारताचा क्रमांक सन २०१८ मधील आकडेवारी नुसार भ्रष्टाचार निर्देशांक यादीमध्ये भारताचा क्रमांक ७८ वा आहे. भ्रष्टाचार या संसर्गजन्य रोगाची लागण संसद मंत्रालये, न्यायालये, औद्योगीक व आर्थिक क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, स्वयंसेवी व सामाजिक संस्था आणि प्रशासकीय संघटंना इत्यादी सर्वच क्षेत्रामध्ये झालेली आहे. आज देशातील जनता भ्रष्टाचाराला कंटाळली आहे. प्रत्येकाच्या मनात भ्रष्टाचाराविषयी चीड आहे. या विरुद्ध जनआंदोलनाचा रेटा आहे. तसेच दृक व श्राव्य मिडीयाचाही पाठींबा आहे. यामुळेच देशातील भ्रष्टाचाराचा समुळ नायनाट करण्यासाठी सकारात्मक् मानसिकता, प्रबळ ईच्छाशक्ती आणि राष्ट्रप्रेमाच्या भावनेतुन शासन, प्रशासन आणि जनतेने कार्य केले पाहिजे.

**भ्रष्टाचाराचा अर्थ आणि रुपे :-**

भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट + आचार यातील 'भ्रष्ट' चा अर्थ होतो वाईट किंवा बिघडलेला किंवा दुष्ट तर 'आचार' या शब्दाचा अर्थ आचरण असा होतो या आधारे स्पष्ट होते की, भ्रष्टाचार म्हणजे वाईट किंवा दुष्ट किंवा अनैतिक आचरण. लोकप्रशासनामध्ये ज्यावेळी प्रशासक आपले अधिकार, सत्ता आणि दर्जाचा वापर सर्व सामान्य जनतेच्या लाभा ऐवजी व्यक्तिगत लाभासाठी करु लागला तर त्याच्या आचरणास भ्रष्ट आचरण म्हटले जाते.एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याने आपला सार्वजनिक पदाचा दुरुपयोग करुन आर्थिक स्वरुपाचा किंवा अन्य प्रकारचा लाभ घेतला तर त्याच्या कृतीस भ्रष्टाचार असे म्हणतात. भ्रष्टाचार संकल्पनेचा अर्थ संकीर्ण आणि व्यापक अशा दोन दृष्टीकोनाव्दारे स्पष्ट करण्यात येतो.

संकीर्ण दृष्टीकोनातुन भ्रष्टाचार म्हणजे एखादे कार्य करण्यासाठी घुस घेणे (पैसे घेणे होय) म्हणजेच आर्थिक लाभ प्राप्त करणे होय. तर व्यापक दृष्टीकोनानुसार सार्वजनिक पदाचा किंवा सत्तेचा दुरुपयोग स्वार्थी उद्देशपुर्ती साठी करुन वाममार्गाने आर्थिक लाभ मिळवणे म्हणजे भ्रष्टाचार होय. थोडक्यात भ्रष्टाचार अशा प्रकारचा व्यवहार आहे की, ज्यामध्ये सरकारी कर्मचारी किंवा मंत्री वैयक्तिक आर्थिक लाभ प्राप्त

Scanned with CamScanner

करण्यासाठी सार्वजनिक कर्तव्यापासुन विचलित होऊन नियमांचे उल्लंघन करतात की, ज्यामुळे त्यांना वैयक्तिक आर्थिक लाभ मिळेल (Elliott and Merril) इलियट आणि मेरिएल यांच्या मते "प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपाचा लाभ मिळवण्यासाठी जाणीवपुर्वक कर्तव्याचे पालन न करणे म्हणजे भ्रष्टाचार होय". संथानम समितीच्या मते सरकारी कर्मचाऱ्यांकडून कार्यपुर्तीच्या वेळी एखादी कृती स्वार्थ साधण्यासाठी किंवा लाभ मिळवण्यासाठी केली असेल किंवा जाणीवपुर्वक केली नसेल तर ती भ्रष्टाचाराच्या श्रेणीमध्ये येते. भ्रष्टाचाराची अनेक रुपे आहेत. कौटिल्य यांनी मौर्यकालीन प्रशासनासंदर्भात भ्रष्टाचाराचे ४० प्रकार सांगितले आहेत. तसेच केंद्रिय सतर्कता आयोगाने भ्रष्टाचाराचे एकुण २७ रुपे सांगितले आहेत. सार्वजनिक धनाचा दुरुपयोग करणे, उपहार घेणे, गुतेदार आणि कर्म यांना सुट देणे, उत्पन्नापेक्षा अधिक वस्तु जवळ ठेवणे, शासकीय कर्मचाऱ्यांचा वैयक्तिक कार्यासाठी वाटप करणे, भर्ती नियुक्ती बदली आणि बढतीसाठी बेकायदेशीररित्या पैसे घेणे इत्यादी. थोडक्यात भ्रष्टाचाराच्या प्रक्रियेमध्ये पुढील बाबी समाविष्ट होतात. १. सरकारी पदाचा किंवा सत्तेचा दुरुपयोग करणे, २. सार्वजनिक सेवेची प्राप्ती करण्यासाठी देण्यात येणारी घुस उदा. विज, पाणी, इत्यादींचे कनेक्शन, ३. सरकारी कामाचे ठेके किंवा गुत्ते प्राप्त करण्यासाठी लाच देणे, ४. रेशेन दुकानामधील वस्तुंचा काळाबाजार करणे, ५. विविध लाइसेन्स व परमिट मिळवण्यासाठी नियमबाह्य पद्धतीने पैसे देणे, ६. आर्थिक फायद्यासाठी आयकर, संपत्तीकर इत्यादीचे कमी मुल्यांकन प्रस्तुत करणे तसेच आयकर चुकविणे, ७. एखाद्या व्यक्तीचे सार्वजनिक कार्यालयाशी संबंधित कार्य करण्यासाठी किंवा न करण्यासाठी आर्थिक लाभ घेणे ८. भर्ती बदली बढतीमध्ये भाई भतीजावादाला प्रोत्साहन देणे. ९. सरकारी कार्य जाणुन बुजुन अडविणे व पैशाची अपेक्षा बाळगणे. १०. अवैध मार्गाने पैसे कमविणे तसे स्वार्थासाठी अनैतिक आर्थिक लाभ मिळवणे तसेच नियम व कायद्याचे उल्लंघन करणे.

भ्रष्टाचाराची वरील प्रमाणे विभिन्न रुपे आहेत. समाजाच्या प्रत्येक संघटनेतील व्यक्तीने स्वार्थपुर्तीसाठी कर्तव्यपालनामध्ये कसुर करणे, अनैतिक मार्गाचा अवलंब करुन पैसे मिळवणे आणि नियम व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या भ्रष्ट प्रवृत्तीचा समावेश भ्रष्टाचारामध्ये होते.

**भ्रष्टाचाराचे निवारण करण्यासाठीचे उपाय :-**

भ्रष्टाचाराची समस्या ही एक व्यक्ती, एक विभाग, सामाजिक क्षेत्र आणि काही विशिष्ट गटाचीच किंवा व्यक्तींची समस्या नाही तर ती संपुर्ण समाजाची समस्या आहे. ही समस्या सर्वच क्षेत्रामध्ये वाढत आहे. यामुळेच शासन आणि प्रशासनामध्ये नैतिकता, पारदर्शकता, आणि सद्आचरण निर्माण् करुन भ्रष्टाचारावर प्रभावी नियंत्रण प्रस्थापित करणे काळाची गरज बनलेली आहे. भ्रष्टाचारावर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी पुढील उपाय सुचविता येतात.

१) पोलिस प्रशासनामध्ये ईमानदारी आणि कार्यक्षमता वाढीस लावणे.
२) न्याय पालिकेतील भ्रष्टाचाराला समाप्त केले पाहिजे. जेणे करुन न्यायपालिका भ्रष्ट व्यक्ती व गुन्हेगारांना कडक शिक्षा ठेवबेल परिणामे भ्रष्टाचारी प्रवृत्तीवर अंकुश बसेल.
३) व्यक्तींमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना विकसित केली पाहिजे तसेच राष्ट्रीय चारित्र्याची निर्मिती केली पाहिजे.
४) देशातील आमदार, खासदार, मंत्री आणि लोकसेवकांना आपल्या वैयक्तिक संपत्तीची दरवर्षी घोषणा केली पाहिजे.
५) सरकारी कर्मचाऱ्यांना पर्याप्त वेतन दिले गेले पाहिजे. तसेच सरकारी कार्यालयामधील अपुऱ्या कर्मचाऱ्यांची समस्या दुर केली पाहिजे.
६) भ्रष्टाचारासंदर्भातील प्रकरणमध्ये कायदेशीर कार्यवाही जलद गतीने करुन संबंधितांवर कठोर शिक्षेची अंमलबजावणी करावी.
७) भ्रष्टाचाराच्या विरोधामध्ये प्रभावी लोकमत निर्माण केले पाहिजे की , ज्यामुळे भ्रष्टाचार व्यक्तीच्या दुष्कृत्याचा भांडाफोड केला जाईल.
८) भ्रष्टाचारावर नियंत्रण प्रस्थापित करणाऱ्या यंत्रणांनी आपले कार्य प्रभावीपणे, कार्यक्षमपणे व पारदर्शकपणे पार पाडले पाहिजे तसेच भ्रष्टाचार विरोधी कायदा १९८८ चा कडक अंमलबजावणी केली पाहिजे.
९) जनतेमध्ये जागृती घडवुन आणुन त्यांना लाच देण्याच्या प्रवृत्तीपासुन दुर केले पाहिजे.

**सारांश:-**

शासक, प्रशासक, उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक आणि जनता यांची भ्रष्टाचाराबाबतची मानसिकता बदलली पाहिजे. प्रत्येकाच्या भ्रष्टाचार प्रवृत्तीला हद्दपार केले पाहिजे. शासक, प्रशासक आणि इतर व्यवसायिक त्यांच्यामध्ये देश व जनतेप्रती आपुलकीची व प्रेमाची भावना निर्माण केली पाहिजे. राष्ट्रभावनेचा विकास करुन भ्रष्ट आचरणाला बाजुला सारले गेले पाहिजे. तसेच देशातील प्रत्येक नागरिकांमध्ये 'लाच देणार नाही व लाच घेणार नाही' या भावनेचा प्रमाणिकपणे विकास करुन त्याला कृतीमध्ये उतरविले आणि स्वार्थ, हव्यास इत्यादीचा त्याग केला तर भ्रष्टाचाराचे समुळ उच्चाटन होऊन देश सर्वच क्षेत्रामध्ये प्रगती करु शकेल.

**संदर्भ सुची :-**

१. डॉ. सुरेंद्र कटारिया, भारतीय लोकप्रशासन, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, नवि दिल्ली.
२. डॉ. हरिश्चंद्र शर्मा, लोकप्रशासन, विश्वभारती प्रकाशन, नवी दिल्ली, २००८
३. डॉ.गणेश् पांडे, भारतीय सामाजिक समस्या, राधा पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.२००७
४. डॉ.बी.एल.फडिया, लोकप्रशासन साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा, २००९
५. Wikipedia.org.



Scanned with CamScanner

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Sponsored By
National Commission for Women, New Delhi
and
Organised By
M.S.P. Madal's Yeshwantrao Chavan College, Ambejogai

One Day National Level Seminar
on

# Government Schemes and women Issues Related to Water, Sanitation and Hygiene

26 March 2019 Special Issue - 168

**Chief Editor**
**Dr. Dhanraj T. Dhangar**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
**Dr. Vanmala Govindrao Gundre**
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

**Dr. Ahilya B. Barure**
Assistant Prof. Dept. of English
Yashwantrao Chavan College, Ambajogai Dist. Beed

**Co-Editor**
Associate Prof. K.D. Gade
Dr. Arvind A Ghodke

RESEARCH JOURNEY

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**Sponsored By**
**National Commission for Women, New Delhi**
**and**
**Organised By**
**M.S.P. Madal's Yeshwantrao Chavan College, Ambejogai**

**One Day National Level Seminar**
**on**

# Government Schemes and women Issues Related to Water, Sanitation and Hygiene

**26 March 2019 Special Issue - 168**

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**

**Dr. Vanmala Govindrao Gundre**
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

**Dr. Ahilya B. Barure**
Assistant Professor, Dept of English,
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

**Co-Editor**
**Associate Prof. K.D. Gade**
**Dr. Arvind A Ghodke**

Scanned with CamScanner

19. Domestic Violence and Rights of Women- An analytical study 69
**Sonwalkar Ramesh Shankarrao**

20. Women Health and Hygiene in India: A Literature Review 72
**Dr.Channaveer R.M. Bhagyashree S.Vadageri**

21. Womens Role In Sanitation 78
**Harsha Rana**

22. Role Of Women In Addressing Issues Related To Sanitation And Water 81
**Dr. Ahilya Bharatrao Barure**

23. शुध्द पाणी व स्वच्छ गांव मोहिमेत ग्रामीण महिलांचा सहभाग 84
**प्राचार्या, डॉ.वनमाला गुंडरे**

24. महिला सबलीकरणामध्ये शासनाची भूमिका 86
**प्रा.डॉ. संजयकुमार हनुमंत जाधव, प्रा.डॉ.डी.डी. भिसे**

25. स्वच्छतागृह सुविधा : एक अभ्यास (विशेष संदर्भ सिरसाळा) 89
**प्रा. माने उषा यशवंतराव**

26. महिला आरोग्य समस्या आणि उपाय एक अभ्यास 93
**प्रा.ए.बी.वाळके**

27. स्त्रिया आणि शाश्वत विकास 96
**प्रा.डॉ. शैलजा भारतराव बरुरे**

28. धनगर समाजाची ओळख आणि विकासात्मक प्रश्न 100
**विलास गोपीनाथ पारखे**

29. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या विचारातील स्त्रि पुरुष समानता आणि महिलांचा सातत्यपूर्ण विकास : एक अभ्यास 103
**प्रा. हिरामन पुजदेकर**

30. पाणी आणि मानव 105
**डॉ. सविता वावगे**

31. महिला आणि शाश्वत विकास **107**
**डॉ. संतोष बाबुराव कुऱ्हे**

32. जल व्यवस्थापनात महिलांची भूमिका 110
**प्रा. राजाभाऊ बंकटराव भगत**

33. महिला आणि पाणी 112
**डॉ.अलका प्रदीप वालचाळे (सरोदे)**

34. महाराष्ट्रातील अंबाजोगाई तालुक्यातील सोपडपट्टीत स्वच्छता क्षेत्रात महिलांच्या भुमिकेतील सर्वेक्षणांचा आढावा 114
**प्रा.इंद्रजीत.आर.भगत, कु. कदम मोनिका मधुकर**

35. पाणी, आरोग्य व स्वच्छते विषयी ग्रामीण महिलांची भूमिका 117
**डॉ. प्रशांत भाऊसाहेब सोळंके**



Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 | March 2019 | UGC Approved No. 40705

# महिला सबलीकरणामध्ये शासनाची भूमिका

**प्रा.डॉ. संजयकुमार हनुमंत जाधव**
लोकप्रशासन विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

**प्रा.डॉ.डी.डी. भिसे**
मराठी विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

**प्रस्तावना :**

समाजाचे स्त्री आणि पुरूष हे दोन अभिन्न अंग आहेत. समाजाच्या अस्तित्वासाठी या दोन्ही घटकांची समान आवश्यकता आहे. यापैकी पुरूष घटक महत्वाचा आणि स्त्री ही गौण आहे असे म्हणता येत नाही. भारतीय संस्कृतीमध्ये प्राचिन काळात स्त्रीयांना पूजनीय स्थान होते. स्त्रीचा अर्थ स्पष्ट करताना विद्वान रमन म्हणतात की, च्पतीसाठी चरित्र, मुलांसाठी ममत्व, समाजासाठी शील आणि जीवन मात्रांसाठी करूणा करणारी महाकृती म्हणजे स्त्री होय.छ स्त्री शिवाय मानवी जीवनाची कल्पनाच करता येत नाही. मध्ययुगीन काळापासून जन्मदात्री असलेल्या स्त्रीचे महत्त्व कमी-कमी होत गेले. आधुनिक काळात, स्त्री ही पुरूषांच्या बरोबरीने विविध क्षेत्रात कर्तुत्व गाजवीत असली तरी ती आज पुरूष - प्रधान मानसिकतेचा बळी ठरत आहे. भारतामध्ये करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणानुसार असे दिसून आले की, दर 28 मिनिटाला एक स्त्री लैंगिक शोषण, दर 43 मिनिटाला एक स्त्री अपहरण आणि दर 54 मिनिटाला एक स्त्री बलात्काराचा बळी पडत असते. अपहरण, लैंगिक शोषन, कुपोषण, अनारोग्य, किमान साक्षरता, कमी मजुरी, बलात्कार, कौटौंबिक हिंसाचार, स्त्रीहत्या, स्त्रीयांचे शोषण इत्यादी विविध समस्यांमध्ये स्त्री गुरफटलेली दिसून येते. पुरूष-प्रधान मानसिकतेच्या चक्रव्युहातून स्त्रीला बाहेर काढून तिच्या मानवी हक्काचे रक्षण करून सर्वांगीन विकासाची गरज आहे. समाजामध्ये सामाजिक न्यायाची स्थापना करण्यासाठी महिलांना सशक्त करणे आवश्यक आहे.

**महिला सबलीकरणाची संकल्पना :**

महिलांना समाजामध्ये त्यांच्या वास्तविक अधिकारांना प्राप्त करण्यासाठी सक्षम बनविणे म्हणजे महिला सबलीकरण होय. स्त्रीला शक्तीशाली बनविणे की, ज्यामुळे ती आपल्या जिवनाशी संबंधीत निर्णय स्वतः घेऊ शकेल आणि समाजामध्ये चांगल्या प्रकारे जीवन जगू शकेल. स्त्रीयांना भौतिक किंवा आध्यात्मिक, शारीरिक किंवा मानसिक, तसेच आर्थिक, राजकीय आणि समाजिक क्षेत्रामये सशक्त बनविण्यासाठी त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे घ्महिला सबलीकरणङ होय. स्त्रियांच्या दृष्टीने समानता, समता न्याय असलेला समाज निर्माण करणे म्हणजे खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या सबलीकरणाचा प्रयत्न करणे होय. भारतीय संदर्भात असे म्हणता येईल की, आर्थिक सामाजिक दृष्या केल्या जाणाऱ्या सुधारणांमधून स्त्री-पुरूषांमध्ये व्यक्ती, समाज, समूह व जातजमात म्हणून स्त्रियांच्या दृष्टीने परिवर्तन होणे ही सबलीकरणाची अट आहे. समाजातील स्त्रीयांना आपल्या जीवनामध्ये सर्व क्षेत्रांत आपल्या सुप्त क्षमता प्रत्यक्ष वापरता येतील असा समाज निर्माण करणे म्हणजे घ्महिला सबलीकरणङ होय. महिला सबलीकरणातील महत्वाची बाब म्हणजे स्त्रीला माणूस म्हणून जगण्याची संधी देऊन तिला तिचे व्यक्तिमत्व विकसीत करण्यास समाजातून प्रोत्साहन दिले गेले पाहिजे तसेच प्रत्येक क्षेत्रात स्त्रीयांना प्ररूषांप्रमाणे समान संधी दिली पाहिजे. ज्या समाजामध्ये स्त्रीचे स्थान सन्मानाचे असते तो समाज प्रगतिशील आणि विकसीत असतो. कुटुंब आणि समाजाच्या निर्मीतीमध्ये स्त्रीचे स्थान महत्वपूर्ण असते. ज्यावेळी समाज सशक्त आणि विकसीत होतो त्यावेळी देश सुध्दा मजबूत होत असतो. अशाप्रकारे राष्ट्राच्या निर्मितीमध्येही स्त्री महत्वाची भूमिका बजावीत असते. यामुळेच महिलाचे सबलीकरण करणे हे राष्ट्रविकासासाठीची प्रमुख अट आहे.

**महिला सबलीकरणामध्ये शासनाची भुमिका :**

राष्ट्रविकासासाठी महिलांची सर्वच क्षेत्रामध्ये प्रगती घडवून आणने गरजेचे आहे. यामध्ये शासनाची भूमिका महत्वाची आहे. स्त्री सक्षमीकरणासाठी शासनाने धारेणे, योजना आणि कार्यक्रम आखून त्यांची प्रभावीपणे अंमल बजावणी करणे गरजेचे आहे. स्त्रीयांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय सबलीकरण करण्यासाठी भारतीय शासनाने पुढील प्रयत्न केलेले आहेत.

**1. संविधानात्मक तरतुदी :-**

भारतीय समाजातील स्त्रीयांचा दर्जा उंचावण्यासाठी राज्यघटनेमध्ये प्रभावी तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. राज्यघटनेच्या कलम 14 मध्ये कायद्यांसमोर समानता आणि कायद्यापासून सर्वांना समान संरक्षण मिळेल अशी तरतुद करण्यात आलेली आहे. राज्यघटनेच्या कलम 15 (1) नुसार लिंग या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव करण्यास प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. तसेच कलम 15 (3) नुसार महिला आणि मुलांसाठी वेगळे नियम बनविण्याची परवानगीही शासनाला देण्यात आलेली आहे. कलम 16 नुसार शासनाच्या अधीन असलेल्या पदावर नियुक्त होण्याची पुरूषाबरोबर स्त्रियांनाही समान संधी देण्यात आलेली आहे. कलम 17 नुसार महिला व पुरूषासोबत असलेली अस्पृश्यता नष्ट करण्यात आलेली आहे. कलम 23 नुसार शोषणा विरूद्ध अधिकार तसेच मानवाचा व्यापार अथवा वेठबिगारीस प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. 73 व्या आणि 74 व्या घटनेदुरूस्ती नुसार राज्यघटनेमध्ये कलम 243 (D) आणि कलम 243 (T) अंतर्गत पंचायतराज संस्था आणि नागरी स्थानिक संस्थामध्ये सदस्य आणि प्रमुखांसाठी सुरूवातीला $1/_3$ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. सन 2011 पासून त्यात वाढ करून महिलांना 50% जागा राखीव ठेवण्यात येत आहेत. भारतीय राज्यघटनेमध्ये महिलांच्या सन्मानाकडेही लक्ष देऊन राज्यघटनेच्या कलम 39 नुसार स्त्री-पुरूष दोघांना समान वेतनाची तरतुद करण्यात आलेली आहे. कलम 42 च्या माध्यमातून महिलांना कामाच्या ठिकाणी न्याय व सुरक्षीतता आणि प्रसुती सहाय्य देण्याची सोय करण्यात आलेली आहे. तसेच कलम 51



Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 | March 2019 | UGC Approved No. 40705

नुसार स्त्रीयांच्या प्रतिमेला हमी पोहचविणाऱ्या प्रथा बंद करण्याची तरतूद केलेली आहे. अशा प्रकारे राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांच्या मानवी अधिकारांना सरंक्षण देण्यात आलेले आहे.

**2. महिलांशी संबंधीत कायदे :**

स्त्रीयांच्या मानवी अधिकारांचे रक्षण करण्याठी आणि भारतीय घटनेने महिलांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचा वापर करण्यासाठी संसदेने विविध कायदे बनविलेले आहेत. त्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे शासनाचे आद्य कर्तव्य आहे. हिंदू विधवा पुर्नविवाह कायदा - 1956, मुस्लीम स्त्री घटस्फोट हक्क व संरक्षण कायदा - 1986, विवाहित स्त्रियांचा संपत्तीचा कायदा 1959, हिंदु वारसा हक्कात मालमत्तेत समान वाटप कायदा 2005, स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंध कायदा 1986, गर्भ धारणा पूर्ण आणि जन्म पूर्व निदांन तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा 1994, किमान वेतन कायदा 1948, समान वेतन कायदा 1976, नौकरीच्या ठिकाणी लैगिक छळापासून महिलांचे संरक्षण विधेयक 2010 इत्यादी या कायद्यांची प्रभवी अंमलबजावणी करून शासन स्त्रीयांच्या सक्षमीकरणामध्ये महत्वची भूमिका बजावीत आहे.

**3. महिलांसाठी स्वतंत्र मंत्रालय आणि राष्ट्रीय महिला आयोग :**

भारतामध्ये महिला आणि बालकांच्या विकासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यात आलेले आहे. या मंत्रालयाच्या माध्यमातून महिला व बाल विकासाठी विविध धोरणे व कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी केली जात आहे. तसेच 31 जानेवारी 1992 मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. हा आयोग महिलांचे घटनात्मक अधिकार आणि कायदेशीर सुरक्षितते संदर्भातील अधिकारांना प्रभाविपणे लागू करतो.

**4. राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण (2001) :**

महिलांना सशक्त बनविण्यासाठी भारतीय शासनाने सन 2001 मध्ये राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण आखले. या धोरणाच्या माध्यमातून महिलांना विविध क्षेत्रामध्ये प्रगती करण्यासाठी आणि सर्वांगिन विकासाच्या आधारभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. महिलांचे सामाजिक, राजकिय, आर्थिक सामर्थ्य वाढविण्यासाठी या धोरणांची अपयुक्ता अधिक आहे.

**5. महिला सबलीकरणासाठी योजना व कार्यक्रमः**

महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी भारतीय शासनाकडून अनेक योजना व कार्यकम आखण्यात आलेले आहेत. त्यातील प्रमुख योजना व कार्यक्रमाचा पुढीलप्रमाणे आढावा घेण्यात आलेला आहे.

I. **DWCRA :** (Development of Women and Children in Rural Areas) ग्रामिण भागातील महिला आणि बालकांचा विकास योजना :- एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रमाचा सहाय्यक कार्यक्रम म्हणून ही योजना सन 1982-1983 पासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश म्हणजे महिलांना आर्थिक दृष्ट्रिकोनातून सक्षम बनविणे हा आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना स्वरोजगारासाठी सक्षम बनविले जाते. त्यासाठी महिलांना प्रशिक्षण रोजगाराची साधने उपलबध करून दिली जातात. ग्रामीण महिलांचे गट त्यांना आर्थिक स्त्रोत उभारण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

II. **महिललांना प्रशिक्षण व रोजगार सहाय्यता कार्यक्रमः**
भारतीय शसनाने सन 1987 मध्ये या कार्यक्रमाचा प्रारंभ केला. यामध्ये कृषी, पशुपालन, दुग्ध व्यवसाय, मत्स पालन, हातमाग, हस्तकला, खादी व ग्रामोद्योग आणि रेशीम उद्योग यांचा समावेश करून त्याबाबतचे प्रतिक्षण महिलांना दिले जाते.

III. **WILL** - Women Integrated Learning For Life (स्त्री- एकात्मिक शिक्षण जीवनासाठी) या कार्यक्रमाचा उद्देश निरक्षर मुली आणि युवतींना साक्षर बनविणे तसेच आरोग्य आणि पोषण, स्वच्छता, कुटुंब कल्याण इत्यादी महत्वाच्या विषयासंदर्भात त्यांच्यामध्ये जाणीव - जागृती घडवून आणणे हा आहे.

IV. **स्वंयसिध्दा :**
महिलांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या योजनेनुसार महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच महिलांचे आरोग्य, राहणीमान, सकस आहार, शिक्षण, स्वच्छता, मानवी अधिकार इत्यादी बाबत महिलांमध्ये जाणीव - जागृती घडवून आणण्याचे कार्य केले जात आहे.

V. **मिशन इंद्रधनूष्य :**
या योजनेच्या माध्यमातून गर्भवती महिला आणि बालकाचे आजारापासून रक्षण करण्यासाठी लसीकरण अभियान चालवले जाते.

VI. **प्रधानमंत्री मातृ वंदना योजना :**
या कार्यक्रमाच्या माध्यमातून गर्भवती किंवा बालकांना दूध पाजणाऱ्या मातांना आर्थिक मदत दिली जाते. प्रत्येक गर्भवती किंवा मातेला 6,000/- रूपये मदत राशी दिली जाते. ज्यामुळे ती महिला आराम करू शकेल आणि वेळेवर आरोग्याची तपासणी करू शकेल. या योजनेच्या देशातील लाखो महिला लाभ घेत आहेत.

VII. **मुली वाचवा, मुली शिकवा योजना :**
महिला सबलीकरणाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी या योजनेची आखणी करण्यात आलेली आहे. या योजनेमुळे देशातील अनेक जिल्ह्यामधील स्त्री-पुरूष लिंग गुणोत्तरामध्ये सुधारणा घडून आलेली आहे. तसेच माध्यमिक शाळेमधील मुलीच्या नोंदणीच्या संख्येतही वाढ झालेली आहे. मुलीच्या शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी शासनाने अनेक शिष्यवृत्या सुरू केलेल्या आहेत. 12 वी पर्यंतचे शिक्षण



Scanned with CamScanner

मुलीसाठी काही राज्यामध्ये मोफत करण्यात आलेले आहे. स्त्री शैक्षणिकदृष्ट्या सबळ झाली की कुटुंबाचा विकास होतो यामुळेच स्त्री शिक्षणाच्या विकासासाठी शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत.

VIII. **महिला उद्योजकांना प्रोत्साहन :**

केंद्र शासनाने मुद्रा योजना आणि स्टॅंडअप इंडिया योजनेच्या माध्यमातून देशातील उद्योजगांना प्रोत्साहन देण्यासाठी कोणत्याही गॅरन्टीशिवाय कर्ज उपलब्ध करून दिले आहे. स्टॅंडअप इंडिया योजनेतंर्गत अनुसूचित जाती आणि जमाती, महिला, इतर मागासवर्गातील उद्योजगांना एक कोटी रक्कमेपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. मुद्रा योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये महिला उद्योजगांची संख्या सुमारे 70% पेक्षा जास्त आहे . यावरून स्पष्ट होते की महिला उद्योजगांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनाकडून कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे.

IX. **स्वच्छ भारत मिशन :**

देशातील सुमारे 30 कोटी महिला शौचालयाच्या सुवीधेपासून दूर आहेत. याचा विपरित परिणाम महिलांच्या आरोग्यावर आणि त्यांच्या सुरक्षिततेवर होतो. महिलांची या प्रश्नातून सुटका करण्यासाठी केंद्र शासनने स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून देशभरात सुमारे 7.25 कोटी शौचालयांची निर्मिती करण्यात आलेली आहे. शाळामध्ये मुलींसाठी सौच्छालयाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

X. **इतर योजना :**

महिलांची धुरापासून मुक्तता करण्यासाठी आणि स्वयंपाक करण्यामध्ये सहजता येण्यासाठी केंद्र शासनाने उज्वला योजनेच्या माध्यमातुन देशातील सुमारे 3.8 कोटी महिलांना गॅसचे कनेक्शन मोफत उपलब्ध करून देण्यास आलेले आहेत. तसेच स्वआधार योजना 2001-2002 बालिका समृध्दी योजना (1996) तात्पुरता निवारा गृह योजना (1969) निराधार महिला, मुर्लींना राहण्याची सोय उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत आहेत. तसेच पंतप्रधान सुरक्षित मातृत्त्व अभियान, पोषण अभियान, पंतप्रधान आवाज योजनेमध्ये महिलांना प्राथमिकता देणे आणि मुस्लिम महिलांच्या सबलीकरणासाठी तीन तलाक विधेयक इत्यादी योजनाही महिलांच्या उत्थानासाठी केंद्र शासनाकडून राबविल्या जात आहेत.

**निष्कर्ष :**

महिलाच्या सबलीकरणासाठी भारतीय शासनांकडून अनेक योजना व कार्यक्रम आखण्यात आलेले आहेत. तरी आजही स्त्रीयांच्या दर्जामध्ये अपेक्षित सुधारणा झालेली दिसून येत नाही. स्त्रियांच्या सबलीकरणाच्या मार्गात रूढी, प्रथा आणि परंपराचे वर्चस्व, पुरूष प्रधान संस्कृतीचे वर्चस्व, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय असमानता, योजना व कार्यक्रमाविषयी जनजागृतीचा अभाव, महिलांची योजनेप्रती उदासिनता, योजना व कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये अकार्यक्षमता, भ्रष्टाचार व पारदर्शकतेचा अभाव इत्यादी अडथळे आहेत. भारतीय शासनाने महिलांच्या सबलीकरणसाठी केलेल्या प्रयत्नामुळे आजची स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि स्वावलंबी होत आहे. शिक्षण, आरोग्य, सरकारी व खाजगी क्षेत्रातील नौकरी, उद्योग आणि व्यवसाय तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये महिला पुरूषांच्या बरोबरीने कार्य करीत आहेत. परंतु महिला सबलीकरणापासून ग्रामीण क्षेत्र, आदिवासी क्षेत्र खूप दूर आहेत. यासाठी देशातील प्रत्येक महिला सक्षम होण्याच्या प्रक्रियेत शासन, जनता आणि प्रशासन या तिन्हीही घटकांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.

**संदर्भ सूची :**


१. Goel Auruna, Violence and Protective Measures for woman Development and rmpowerment, Deep. & Deep publication, New Delhi, 2004.
२. माहेश्वरी अविनाश, महिला अधिकार और कानून, प्रिज्मबुक्स, जयपूर, 2011.
३. गोटे-गव्हाणे शुभांगी, महिला सबलीकरण स्वरूप व समस्या, वरद पब्लिकेशन, औरंगाबाद, 2004.
४. डॉ. विलास आढाव, महिला सबलीकरण, प्रोढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग, पुणे विद्यापीठ.
५. कुरूक्षेत्र, सप्टेंबर 2018.
६. Womenङ्ख Empowerment Wikipedia.org.




Scanned with CamScanner

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***

# शाश्वत कृषी विकासासमोरील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक आव्हान

**डॉ. जाधव संजयकुमार हनुमंतराव**
*लोकप्रशासन विभाग,*
*यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.*
Email: jadhavsanjaykumar28@gmail.com

*संक्षिप्त गोषवारा (Abstract) :*

भारत हा कृषि प्रधान देश असून भारतात ६ लाखाहून अधिक गावे आणि ४ हजारापर्यंत शहरे आहेत. भारतीय लोकसंख्येपैकी ६८.४ टक्के लोकसंख्या गावामध्ये तर ३१.६ टक्के लोकसंख्या शहरामध्ये निवास करते. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के कृषि कार्यामध्ये संलग्न आहेत. भारतातील बहुसंख्य जनतेचा उदनिर्वाह कृषि व्यवसायावर अवलंबून आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून कृषिला ओळखले जाते. राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कृषिचा वाटा सुमारे ४५ टक्के असला तरी ती अत्यंत समस्याग्रस्त आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मते, "शेतीला सर्वाधिक प्राथमिकता देण्याची गरज आहे. जर शेती अयशस्वी झाली तर सरकार आणि राष्ट्र दोन्ही अयशस्वी राहतील." यामुळेच स्वातंत्र्यप्राप्ती नंतर पहिली आणि तिसरी पंचवार्षिक योजना प्रामुख्याने कृषि आणि ग्रामविकासासाठी राबविली गेली. तसेच अन्नधान्याच्या बाबतीत देशाला स्वंयपूर्ण बनविण्यासाठी आणि कृषि उत्पादन वाढविण्यासाठी हरितक्रांती राबविली गेली. परंतु शासनाने कृषि व शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने फारसे लक्ष दिले नाही. परिणामी आज देशाला स्वातंत्र्य मिळून ७१ वर्षे पूर्ण झाली. तरी सामान्य शेतकऱ्यांच्या दर्जात सुधारणा झालेली नाही. त्यांचे हाल मागे तसे पुढे चालूच राहिलेले आहेत. स्वातंत्र्यामध्येही शेतकरी हलाखी जिणे जगतो आहे.

**Keywords:** शाश्वत कृषी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या

## प्रस्तावना

आधुनिक युगातील मानवाने अनियोजित आणि दिशाहीन पध्दतीने विकास केलेला आहे. यामुळे जगातील नैसर्गिक संसाधने कमी झाली आहेत. तसेच पृथ्वीवरील अनेक जीव–जंतू आणि अनेक वनस्पती नष्ट होत आहेत. त्याचबरोबर पृथ्वीच्या तापमानामध्ये वाढ आणि भूजलाच्या कमतरतेचे संकट निर्माण झालेले आहे. यासाठी नियोजनबध्द विकासाची आवश्यकता आहे जो वर्तमान पिढीबरोबरच भावी पीढिचे कल्याण सुनिश्चित करेल. यास शाश्वत विकास असे म्हणतात. शाश्वत विकासाच्या अनेक क्षेत्रापैकी कृषी क्षेत्र हे एक प्रमुख क्षेत्र आहे. शाश्वत कृषी विकासासमोर आज शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे अव्हान आहे.

भारत हा कृषि प्रधान देश असून भारतात ६ लाखाहून अधिक गावे आणि ४ हजारापर्यंत शहरे आहेत. भारतीय लोकसंख्येपैकी ६८.४ टक्के लोकसंख्या गावामध्ये तर ३१.६ टक्के लोकसंख्या शहरामध्ये निवास करते. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के कृषि कार्यामध्ये संलग्न आहेत. भारतातील बहुसंख्य जनतेचा उदनिर्वाह कृषि व्यवसायावर अवलंबून आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून कृषिला ओळखले जाते. राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कृषिचा वाटा सुमारे ४५ टक्के असला तरी ती अत्यंत समस्याग्रस्त आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मते, "शेतीला सर्वाधिक प्राथमिकता देण्याची गरज आहे. जर शेती अयशस्वी झाली तर सरकार आणि राष्ट्र दोन्ही अयशस्वी राहतील." यामुळेच स्वातंत्र्यप्राप्ती नंतर पहिली आणि तिसरी पंचवार्षिक योजना प्रामुख्याने कृषि आणि ग्रामविकासासाठी राबविली गेली. तसेच अन्नधान्याच्या बाबतीत देशाला स्वंयपूर्ण बनविण्यासाठी

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***

आणि कृषि उत्पादन वाढविण्यासाठी हरितक्रांती राबविली गेली. परंतु शासनाने कृषि व शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने फारसे लक्ष दिले नाही. परिणामी आज देशाला स्वातंत्र्य मिळून ७१ वर्षे पूर्ण झाली. तरी सामान्य शेतकऱ्यांच्या दर्जात सुधारणा झालेली नाही. त्यांचे हाल मागे तसे पुढे चालूच राहिलेले आहेत. स्वातंत्र्यामध्येही शेतकरी हलाखी जिणे जगतो आहे.

शेतीची मशागत करून अन्नधान्य पिकवणारा लाखांचा पोशिंदा, आमचा अन्नदाता अस्मानी व सुल्तानी संकटात वेढलेला आहे. परिणामी तो आत्महत्या करीत आहे. सरकारी आकडेवारीनुसार देशात सन २०१७ मध्ये २९१७ शेतकऱ्यांनी मृत्युला कवटाळले आहे. तर २०१८ मध्ये २७६१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातही शेतकऱ्यांच्या आत्महत्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. महाराष्ट्रामध्ये सन २०१३ ते २०१८ मध्ये सुमारे १५३५६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. विदर्भ आणि मराठवाडा विभागात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. मराठवाड्यामध्ये सन २०११ पासुन सततचा दुष्काळ, अवकाळी पाऊस, अवर्षण, अतिवृष्टी, गारपीट व नापिकी अशी संकटे आलटुन–पालटुन येत आहेत. मराठवाड्यामध्ये सन २०११ मध्ये ४३५, सन २०१४ मध्ये ५६९ आणि २०१५ मध्ये ६२८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या नोंदी आहेत. प्रसिध्द मराठी साहित्यीक आनंद यादव यांच्या मते, "गांधीजीच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला राजकीय पुढाऱ्यांनी पाठिंबा दिला असता तर खेडे सुजलाम् सुफलाम् झाले असते. परंतु तसे न झाल्यामुळे खेड उध्वस्त होत आहे. परिणामी शेतकऱ्यांचे शोषण होऊन शहर, भांडवलदार, व्यापारी, उद्योजक, सरकार व पक्ष हे सर्व पोसत आहेत." शेतकऱ्यांच्या आत्महत्या होण्यामागे पुढील अनेक कारणे कारणीभूत असल्याचे दिसुन येते.

शेतमालाला कमी भाव ठेवण्याचे शासनाचे धोरणे :

शेतकऱ्यांचे धान्य लेव्हीच्या रूपाने सक्तीने कमी भावात लुटण्याची पध्दत ब्रिटीश साम्राज्यवाद्यांनी अवलंबली होती. आजही शासनाने शेतीमालाच्या भावाच्या बाबतीत साम्राज्यवाद्यांची परंपरा चालु ठेवलेली आहे. त्यामुळे भारताच्या शेतीची, शेतकऱ्यांची आणि ग्रामीण भागांची स्थिती अतीशय विदाक झालेली आहे.

उत्पन्नातला वाढता भेदभाव :

सरकारी नोकरदार व इतर पगारदारांचे वेतन स्वातंत्र्य प्राप्तीपासुन आजतागायत कितीतरी पटीने वाढलेले आहे. वेतनवाढीसाठी शासनाने सात वेतन अयोग नेमून नौकरवर्गाच्या वेतनात भरमसाठ वाढ केलेली आहे. शासनाने पांढऱ्या फितीच्या अनुउत्पादक घटकांवर पैशाचा पाऊस पाडून मोठ्या प्रमाणात कररूपी पैशाची उधळण केली व चंगळवादी प्रवृत्तींना प्रोत्साहन दिल आहे. परंतु देशातील अन्नदात्या शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल शासनाला नाही. शेतकऱ्यांच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर असा भाव मिळू दिला जात नाही. परिणामी शेतकऱ्यांना कष्टांना मोबदल्यात अत्यल्प उत्पन्न मिळते. देशातील उत्पन्नातल्या भेदभावाचे हे भयावह अंतर गरीब कष्टकऱ्यांची मानसिकता दुर्बल बनवत आहे.

नैसर्गिक संकटे :

शेती व्यवसाय हा पूर्णत: निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाच्या लहरीपणावर शेतीउत्पादन अवलंबुन असते. निसर्गाची लहर कोणत्या स्वरूपाची असेल हे निश्चितपणे सांगता येत नाही. पावसाचे अनियमित स्वरूप, गारपीट, वादळे, अतिवृष्टी, थंडीची लाट, उष्णतेची लाट, महापूर आणि दुष्काळ इत्यादी अस्मानी संकटानी शेती व्यवसाय कोलमडुन जातो. तसेच वाढती रोगराई व कीड याचाही धोका शेती उत्पादनावर होतो.

शेतीमालाच्या भाववाढीवर अंकुश :

अपघाताने काही शेतीमालाचे भाव क्वचित प्रसंगी वाढतात. (उदा, कांदा, टोमॅटो, तूर डाळ इ.) तेव्हा शासकीय यंत्रणा, व्यापारी उद्योगक्षेत्र आणि प्रसारमाध्यमे महागाई भरमसाठ वाढली म्हणून आकाशपाताळ एक

करतात जणू काही भयंकर संकटे ओढावले आहे. शासनाकडून त्वरित उपाययोजना आखुन हे भाव कमी करण्याचे कार्य केले जाते. यासाठी शासन शेती मालाची निर्यात थांबवते. भाववाढ झालेल्या मालाची आयात वाढवली जाते. त्यावर मोठ्या प्रमाणावर परकीय चलन खर्ची केली जाते. परंतु शेतकऱ्यांच्या मालाला जास्त भाव मिळू दिला जात नाही. यातुन शेतकऱ्यांची आर्थिक कुंचबना वाढविली जाते. याचा विपरित परिणाम शेतकऱ्यांच्या मानसिकतेवर होत असतो.

मूलभुत गरजापुर्ती व उत्पन्न यात भिन्नता :

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण या मूलभूत गरजा तसेच वाहतुक व्यवस्था, शेतीसाठीची सामग्री उदा. शेती अवजारे, बी, खते, औषधे इत्यादींच्या खर्चात वाढ झालेली आहे. आज शेती उत्पादनाच्या खर्चात १५ पटीने वाढत झालेली आहे. या सर्व खर्चाची पूर्तता करणे शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनातून परवडेनासे झाले आहे. यातुनच त्यांच्यावरील ताण–तणावात वाढ होत आहे.

नफेखोर दलालांची यंत्रणा :

शेतकऱ्यांकडुन उत्पादित केलेला शेतमाल विक्रीसाठी बाजारपेठेत आणला जातो. परंतु त्याठिकाणी विक्री करण्यासाठी पादर्शक व विश्वासहार्य यंत्रणा उपलब्ध नसल्याने नफेखोर दलालांच्या तावडीत सापडतो. तो शेतीमाल कमी किंमतीत खरेदी करतो. परिणामी शेतकऱ्याला कमी प्रमाणात पैसा स्वीकारणे भाग पडते. या रक्कमेत शेतकऱ्यांच्या गरजा भागत नाही. अपुऱ्या गरजा भागविण्यासाठी तो कर्जाद्वारे पैसा उपलब्ध करतो.

पायाभूत सुविधांचा अभाव :

शेतीपर्यंत पायाभूत सुविधा अजुनही पोहचलेल्या नाहीत. आजही देशात अनेक ठिकाणी रस्ते नाहीत. पुरेसा व वेळेवर विद्युत पुरवठ्याचा अभाव, कार्यक्षम वाहतुक यंत्रणेचा अभाव, समन्यायी तत्वावर पाणी वाटपाचा अभाव, गोदाम व शीतगृहाचा अभाव, कृषि सेवा केंद्र, पीक संरक्षण योजना इत्यादींच्या अभाव आहे.

खाजगी सावकारांचा पाश :

शेतकऱ्यांना पत नाही असा एक गैरसमज बॅंकेच्या अधिकाऱ्यांमध्ये आहे. त्यांच्याकडून वेळेवर कर्ज फेड होणार नाही त्यामुळे शेतकऱ्यांना सहजासहजी बॅंकेकडुन कर्ज उपलब्ध होत नाही. तसेच कर्ज मागण्याची पध्दत, पीक कर्जाचा अधिकारी इत्यादी बाबत शेतकऱ्यांमध्ये अज्ञान आहे. यामुळे शेतकरी खाजगी सावकाराकडे वळतो. खाजगी सावकार शेतकऱ्यांला ३ ते १२ टक्के व्याज दरात कर्ज देतात. यातुन शेतकरी खाजगी सावकारांना पाशात अडकत जातो.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जवाबदार असणारी इतर अनेक कारणेही आहेत. शेतीव्यतिरिक्त इतर उत्पनाच्या साधनांचा अभाव, लग्न समारंभ व इतर सामाजिक रीती व त्यावर होणारा खर्च, समन्यायी पाणी वाटपाचा अभाव, जलसंधारण व जलसिंचन साधनांची कमतरता, शेती व त्यास पुरक व्यवसायाच्या संदर्भातील शासकीय खाती, प्रशासकीय कार्यालये जबाबदारीचे व्यवस्थितपणे पालन करीत नाहीत. राजकीय नेते व नोकरवर्ग यांच्यातील वाढता भष्ट्राचार इत्यादी.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या या समस्येवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी पुढीलप्रमाणे काही उपाय सुचविता येऊ शकतात. शेतीवरचा दर–हेक्टरी खर्च कमी करणे व त्यासाठी सेंद्रिय धान्योत्पादन व फलोत्पादन यांना प्राधान्य देणे, शेतकऱ्यांसाठी किमान उत्पन्नांची हमी देणारी सर्वकष पीक विमा योजना राबविण्यात यावी, मातीची सुपिकता जपण्यात यावी व जमिनीची धूप थांबवण्यासाठी उपाय करावेत, अंदाजपत्रकामध्ये कृषिक्षेत्रावरील वित्तीय तरतूद वाढविण्यात यावी. जलसिंचनाखालील क्षेत्रामध्ये वाढ करून हे क्षेत्र ४५ टक्क्यापर्यंत वाढवावे. यासाठी जलसंधारणाच्या योजना प्रभाविपणे राबविण्यात याव्यात, अमेरिका, ब्रिटन, जपान यासारख्या देशात शेतीमालाला भावाच्या बाबतीत संरक्षण दिलेले आहे. औद्योगिक मालाच्या वाढत्या किंमतीबरोबर शेतीमालाच्या

किंमतीही त्याच प्रमाणात वाढल्या पाहिजेत हे धोरण त्यांनी चिवकारलेले आहे. तसेच शहरातील उच्च प्रतीच्या राहणीमानाच्या दर्जा प्रमाणेच ग्रामीण भागातील शेतकरी व कष्टकऱ्यांचे राहणीमानही उंचावलेले राहिल. याप्रमाणे शेती उत्पादनाच्या भावाची श्रेणी ठेवली जाते. याप्रमाणे भारतीय शासनाने शेतीमालाच्या भावाला संरक्षण द्यावे आणि शेतकऱ्यांना विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. उदा. गोदामे, शीतगृह, शेतीअवजारे, वीज आणि पाणी यांचा पुरवठा अत्यल्प दरात व नियमितपणे करणे इत्यादी.

कायद्यामध्ये परिवर्तन करून पारंपारिक बियाणे स्वत: तयार करून वापरण्याची मुभा शेतकऱ्यास देणे, शेतीमालास योग्य भाव देण्यासाठी सध्याच्या दलाल–प्रणीत व्यवस्थेत बद्दल करून शेतकरी व ग्राहक यांचा थेट आपासात – व्यवहार घडेल अशी व्यवस्था निर्माण करणे. उत्पादन खर्चावर आधारित शेतीमालाचा भाव ठरविण्याची पध्दत राबविण्यात यावी. तसेच जादा झालेल्या उत्पादित मालाची निर्यात करून परकीय चलन मिळू शकेल. किंमतीमध्ये सातत्य राखण्यासाठी सरकारला शेत मालाच्या निर्यातीसाठी आवश्यक ते अनुदान द्यावे लागेल.

शेती उत्पादन पध्दती ही मोठ्या प्रमाणावर प्रदुषनकारी रसायणावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीची सुपिकता कमी होत चाललेली आहे. तसेच शेतीव्यवस्थेचा जैव आधार अध्वस्त होत आहे. अन्नसाखळी, विषाक्त आणि हवा पाणी प्रदुषीत होत आहे. जागतिक तापमानवाढीचे रसायनावर आधारित हे एक प्रमुख कारण आहे. यासाठी शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या घातक रसायनावर बंधने आणल्याशिवाय मानव व पृथ्वीची सुरक्षितता अश्यक्य आहे. शेतीमध्ये रासायनीक खतांच्या वापराऐवजी सेंद्रिय खतांचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करणे आणि त्यांना सेवा–सुविधा देणे गरजेचे आहे. सेंद्रिय खतांच्या वापरातून शेतकऱ्यांच्या पैशाची बचत होते आणि जमिनीचा पोत कायम राहून भाविपिढ्यांसाठीही सुपिक शेती टिकून राहु शकते.

भारतामध्ये १५ टक्के पीक उत्पन्नाचे नुकसान हवेच्या प्रदुषणाने होते असा लंडन व दिल्ली येथील संशोधन संस्थानी संयुक्त अहवालाद्वारे सांगितलेले आहे. त्याची प्रतिवर्षी भरपाई केली तरी भारतातील शेतकरी कर्जमुक्त होऊन तो देशाला कर्ज देऊ शकेल. कोरडवाहू शेतकऱ्यांच्या ज्वारी, मका, कापूस, तुर, सोयाबीन, शेंगदाणा या पिकांवर आधारित प्रक्रिया उद्योग व बाजारपेठा तालुकानिहाय ग्रामीण क्षेत्रांत उभे करणे आणि त्या उद्योगात स्थानिक शेतकऱ्यांना सहभागी करून त्यांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणली पाहिजे. ग्रामीण भागातील शेतमजूर, कारागीर व इतर कष्टकरी लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी लघू व कुटीरउद्योगांना प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच शेतकरी, शेतमजूर व अन्य कामगार इत्यादींना निवृत्तीवेतन देण्याची व्यवस्था शासनाने करावी. त्याचबरोबर शासनाने कृषि व कृषि संलग्न व्यवसायावर आधारित विविध योजनांची पारदर्शकपणे आणि कार्यक्षमपणे अंमलबजावणी करण्यात यावी आणि शासकीय व प्रशासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचारावर आळा घालण्यात यावा. कृषि मंत्रालयापासून ते पंचायत समितीअंतर्गत कार्य करणाऱ्या कृषि विस्तर अधिकारी व कृषि सेवकापर्यंत सर्वच घटकांनी आप–आपली जबाबदारी निष्ठापूर्वक आणि कार्यक्षमपणे बजवावी जेणेकरून कृषि समोरील समस्या सोडून शेतकऱ्यांच्या जीवनात संपन्नता येऊ शकेल. या माध्यमातून स्व.विनोबाजीच्या स्वप्नातील स्वतंत्र गावांचा स्वतंत्र देश निर्माण होऊ शकेल.

संदर्भसूची :

[1] Bansil P.C., Agricultural Problems of India, Vikas Publication, New Delhi, 1977
[2] डॉ. एम.पी.सिंह, अर्थशास्त्र, महाकाली प्रकाशन, कानपुर, २०११.
[3] माजिद हुसेन, कृषि भूगोल, रावत पब्लिकेशन्स, नई दिल्ली, २००४.
[4] डॉ. द.के. गंधारे (संपा.), शेतकऱ्यांची हाक, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद २००७.
[5] लोकराज्य मार्च २०१५, दुष्काळातून समृध्दीकडे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

28[Th] January 2019 Special Issue – 106

# The Changing Role of the Welfare State in the Last Two Decades

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. A.M. More
Dept. of Economics
Vasundhara College, Ghatnandur,
Tq. Ambajogai, Dist. Beed

RESEARCH JOURNEY

Scanned with CamScanner

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

28th January 2019 Special Issue – 106

# The Changing Role of the Welfare State in the Last Two Decades

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. A.M. More
Dept. of Economics
Vasundhara College, Ghatnandur,
Tq. Ambajogai, Dist. Beed

RESEARCH JOURNEY

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**28 Janary 2019 Special Issue- 106**

# The Changing Role of the Welfare State in the Last Two Decades

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Dr. A.M. More**
**Dept. of Economics**
Vasundhara College, Ghatnandur,
Tq. Ambajogai, Dist. Beed



Scanned with CamScanner

47. शासन आणि कल्याणकारी योजना 155
**प्रा.डॉ.अर्जुन मोरे, दुर्गादास चौधरी**

48. भारतातील कामगाराचे अधिकार 158
**डॉ. अनंता बापुराव देशमुख**

49. भारतातील कामगार सुधारणा व आव्हाने 162
**प्रा.लोढे गणेश**

50. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे स्थान 164
**प्रा.डॉ.सुरेश टी. सामाले**

51. भारतातील राष्ट्रीयकृत बँका : एक चिंतन 167
**डॉ. बी.के. शिंदे**

52. कामगार कल्याणकारी कायद्यांचा आढावा 170
**डॉ.सौ.मनिषा देशमुख**

53. जागतिकीकरणाचे भारतीय कृषी क्षेत्रावरील परीणाम 172
**प्रा. डॉ. खोंड सुरेश वसंतराव**

54. बँकिंग लोकपाल योजना 174
**प्रा. घुले उमेश भास्कर, प्रा. जाधव हेमराज वामनराव**

55. शासन आणि भारतीय कृषी व्यवसाय 176
**प्रा.गित्ते दत्तात्रय अशोकराव**

56. शासन आणि कल्याणकारी योजना 177
**प्रा. गोदाम रवि शाम**

57. भारत सरकारच्या कल्याणकारी योजना 179
**वसंत नथु हिस्सल**

58. भारत सरकारच्या कृषी योजनेचा एक चिकित्सक अभ्यास 182
**प्रा. डॉ. कागदे बा.बा.**

59. भारतातील कामगार कायदे : एक अभ्यास 184
**प्रा.डॉ.मैंद बी.व्ही.**

60. शासन आणि कामगार कायदे 187
**डॉ. रनमाळ पांडूरंग श्रीरंगराव**

61. केंद्र शासन आणि भारतीय कृषी 189
**प्रा.डॉ. संजयकुमार हनुमंतराव जाधव**

62. शाश्वत शेतीसाठी मृद आणि जलसंधारणाची गरज 192
**प्रा.डॉ.डी.बी.तांदुळजेकर**



Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue - 106 | January 2019 | UGC Approved No. 40705
The Changing Role of the Welfare State in the Last Two Decades

# केंद्र शासन आणि भारतीय कृषी

**प्रा.डॉ. संजयकुमार हनुमंतराव जाधव**
लोकप्रशासन विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.

---

**प्रस्तावना :-**

घ्कृषीङ हे भारताच्या अर्थव्यवस्थेतील महत्वाचे प्रमुख क्षेत्र आहे. या क्षेत्राचा GDP (Gross Domestic Product) एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाटा सुमारे 18 टक्के आहे. देशाच्या एकूण रोजगार क्षेत्रापैकी सुमारे 50 ते 54 टक्के रोजगार कृषी क्षेत्र पुरवते. भारताच्या परदेशी व्यापाराशी कृषी क्षेत्राचा घनिष्ठ संबंध आहे. भारताला निर्यातीतुन मिळणाऱ्या उत्पनामध्ये कृषी क्षेत्राचा हिस्सा 14.7 टक्के इतका आहे. डाळी, तांदूळ, गहू, मसाले पदार्थ इत्यादीचे जगामध्ये सर्वात जास्त उत्पादन भारतामध्ये घेतले जाते. फळे आणि आणि भाजीपाला उत्पादनामध्ये भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. यामुळेच कृषी क्षेत्राला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखले जाते. देशातील सुमारे 6.40 लाख गावामध्ये राहणाऱ्या सुमारे 70 टक्के लोकसंख्येच्या उपजिवीकेचे प्रमुख साधन घ्कृषीङ आहे. देशामध्ये एकूण शेतीयोग्य जमिन सुमारे 18.5 कोटी हेक्टर आहे त्यापैकी सध्या 17.2 कोटी हेक्टर जमीनीवर शेती केली जाते. उपलब्ध शेती क्षेत्रापैकी सुमारे 63 टक्के शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. देशाला आधुनिक काळामध्ये आर्थिक महासत्ता बनवायचे असेल तर कृषी क्षेत्राच्या विकासावर शासनाला लक्ष देणे आवश्यक आहे. कृषी क्षेत्राच्या विकासावर ग्रामीण क्षेत्राचाही विकास अवलंबून आहे.

भारतामध्ये मध्ययुगीन काळापासून ते ब्रिटिश काळापर्यंत कृषी विकासावर विशेष लक्ष दिलेले दिसून येत नाही. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनाने कृषी क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष देण्यास प्रारंभ केला. प्रारंभी पंचवार्षिक योजनामध्ये कृषीच्या विकासासंदर्भात विविध तरतूदी करून नियोजनबद्ध विकासाला चालना देण्यात आली. सन 1967 मध्ये शासनाने पहिली हरित क्रांती घडवून आणली. तसेच 1983 मध्ये दुसरी हरित क्रांती तांदूळ उत्पादनासाठी राबविण्यात आली. हरितक्रांतीमुळे शेती उत्पादनात वाढ झाली. या हरितक्रांतीमुळे शेती उत्पादनात वाढ झाली विशेषतः गहु आणि तांदळाचा उत्पादनात वाढ झाली. अशाप्रकारे हरितक्रांती अन्नधान्य उत्पादन वाढीसाठी राबविण्यात आली. यानंतर श्वेत क्रांती - दुध उत्पादन, निळी क्रांती - मत्स्य उत्पादन, पिवळी क्रांती - तिळ उत्पादन, सुनहरी क्रांती - ताग आणि फलोत्पादन आणि गोल क्रांती - आलू उत्पादन इत्यादी क्रांती राबविण्यात आलेल्या आहेत. स्वातंत्र्य प्राप्ती पासून आज पर्यंतच्या शासनाने कृषी क्षेत्राच्या विकासासंदर्भात अनेक धोरणे, योजना, कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी केलेली दिसून येते. या विचार धारेला अनुसरूनच वर्तमान केंद्र शासनाने कृषी क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य दिलेले दिसून येते.

- **प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना :**

निश्चित आणि जास्तीच्या कृषी उत्पादनासाठी सिंचनाचे महत्व आहे. परंतु स्वातंत्र्य मिळून भारताला आज 72 वर्षे पूर्ण झालेली आहेत तरी देशातील सुमारे 45 टक्केच शेती योग्य जमीन सिंचनाखाली आलेली आहे. उर्वरित 55 टक्के जमिन पावसाच्या लहरी स्वरूपावर अंवलबून आहे. यामूळे कृषी उत्पादनात घट येऊन शेतकऱ्यांच्या जीवनमानावर त्याचा विपरीत परिणाम होतो. यातूनच शेतकऱ्यांच्या आत्महत्या सारखा गंभीर प्रश्न देशासमोर निर्माण झालेला आहे. यासारख्या समस्यातून मार्ग काढण्यासाठी आणि 2022 पर्यंत शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुपट्टीने वाढ करण्यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (PMKSY) Pradhan Mantri Krishi Sinchai Yojana 2015 पासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेसाठी प्रारंभी 2,600 कोटी रूपयांची तरतूदी केलेली होती. या योजनेचे प्रमुख उद्दिष्टे म्हणजे ^प्रत्येक शेतासाठी पाणी उपलब्ध करणे आणि प्रती थेंब अधिक उत्पादन* हे आहे. या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी नदी संपर्क योजनेची कार्यक्षमतेने अंमलबजावनी करणे, प्रत्येक गावामध्ये कमित कमी एका जल-संग्रहण तलावाची निर्मिती करणे, रखडलेल्या जलसिंचन योजना कार्यक्षमतेने पूर्तो करणे आणि ^प्रत्येक थेंब अधिक उत्पादन* या ध्येयाची पूर्तता करण्यासाठी सुक्ष्म जलसिंचन साधनांचा व्यापक विस्तार करणे इत्यादी कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात आलेले आहे.

- **प्रधानमंत्री ग्राम सिंचन योजना (PMGSY)**

या योजनेचा प्रारंभ 1 जुलै 2015 पासून करण्यात आलेला आहे. या योजनेचा उद्देश क्षेत्रीय स्तरावरील सिंचन प्रणालीमध्ये गुंतवणूक आकर्षित करणे हा आहे. देशामध्ये शेती योग्य जमीन तयार करणे, पाण्याचा अपव्यय कमी करण्यासाठी शेतामध्ये पाण्याचा जास्तीचा होणारा वापर ठिबक सिंचन साधनाच्या वापरातून कमी करणे, पाणी बचत तंत्रज्ञान आणि सिंचन लागू करत पीक उत्पादनात वाढ करणे इत्यादी या योजनेची उद्दिष्टे आहेत.

- **प्रधानमंत्री पिक विमा योजना (PMFBY)**

13 जानेवारी 2016 पासून या योजनेचा प्रारंभ खरीप हंगामापासून करण्यात आलेला आहे. या योजनेतंर्गत शेतकऱ्यांना रब्बी आणि खरीप पिकांसाठी विमा संरक्षण दिले जाते आणि आर्थिक मदत पुरविली जाते. या योजनेत समाविष्टे पिके पुढीलप्रमाणे आहेत. भात, ज्वारी, बाजरी, गहू, नाचणी, तूर, मुग, उडीद, हरभरा इ. तृणधान्य व कडधान्य तसेच कारळे, भुईमूग, तीळ, सोयाबीन, सूर्यफूल, करडई इत्यादी गळीत धान्य, आणि कापूस व कांदा या नगदी पिकांचा समावेश करण्यात आलेला आहे, या योजनेचे पुढील उद्दिष्टे आहेत.

- शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारीत मशागतीचे तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे.
- नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे.
- पिकांच्या नुकसानीच्या कठीण परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे.
- कृषिक्षेत्राच्या पतपुरवठ्यामध्ये सातत्य ठेवणे.

सर्वात कमी प्रिमियम, पेरणीपूर्वी आणि कापणीनंतरही विमा संरक्षण तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पीक नुकसानापोटी शेतकऱ्यांना संपूर्ण विमा रक्कम देण्यासाठी विमा हप्त्यांची उर्वरित रक्कम सरकारतर्फे जमा केली जाते. हे या योजनेचे वैशिष्ट्ये आहे.

- **मृदा कार्ड योजना (Soil Health Card Scheme)** मृदा आरोग्य कार्ड योजनेचा प्रारंभ केंद्र सरकारने 19 फेब्रुवारी 2015 मध्ये केलेला आहे. या योजनेनुसार सरकारने देशातील शेतकऱ्यासाठी एक ^मृदा कार्ड* जाहिर केलेले आहे. या कार्डामुळे शेतकऱ्याला शेतातील मातीच्या गुणवत्तेचे



Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | Special Issue - 106 | January 2019 | UGC Approved No. 40705
The Changing Role of the Welfare State in the Last Two Decades

परिक्षण करून जमिनीचा पोत सुधारण्यासाठी मदत होत आहे. यामुळे शेतीतून गुणवत्तापूर्ण आणि जास्तीचे उत्पादन मिळण्यास सहाय्य होत आहे. शेती उत्पादनासाठी पोशक मातीची आवश्यकता असते. परंतु मातीची गुणवत्ताच चांगली नसेल तर उत्पादनाचा दर्जा आणि उत्पादनात वाढही होऊ शकत नाही. जमिनीचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी व खतांच्या संतुलित परिणामकारक वापरासाठी मृदा आरोग्य कार्ड योजना राबविण्यात येत आहे. सन 2017 पर्यंत 10.58 कोटी मृदा कार्ड चे वितरण करण्यात आलेले आहे. या कार्डच्या रूपात शेतकऱ्यांना एक अहवाल देण्यात येईल आणि या अहवालामध्ये आरोग्य, मातीची कार्यात्मक वैशिष्ट्ये पाणी आणि विविध पोषक तत्वांची उपलब्धता आणि मातीतील दोष दुर करण्यासाठी काही सुधारात्मक उपाय इत्यादी विषयी माहिती दिलेली असते. या कार्डमूळे शेतकऱ्यांना जमिनीमध्ये कोणत्या पोषक तत्त्वांची कमतरता आहे, कोणत्या खतांची आवश्यकता आहे, याची माहिती मिळाल्यानंतर ते कृषीतज्ञाच्या सल्ल्यानुसार जमिनीमध्ये योग्य प्रमाणात योग्य त्या खतांचा वापर करतील आणि शेती उत्पादनामध्ये वाढ होईल.

- **पारंपारिक कृषी विकास योजना (Traditional farming Improvement programme)**

शेतीवरील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी आणि जैविक खते वापरण्यात शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेचा प्रारंभ भारतीय शासनाने एप्रिल 2014 मध्ये केलेला आहे. या योजनांच्या माध्यमातुन देशातील शेतकऱ्यांना जैविक शेती करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. या योजनेचे दुहेरी लक्ष्य आहे. त्यापैकी पहिले म्हणजे जैविक कृषी उत्पादनामध्ये वाढ करणे आणि दुसरे म्हणजे जैविक कृषीच्या माध्यमातुन मातीच्या आरोग्याला संपन्न बनविणे होय. या योजनेनुसार सन 2017-18 पर्यंत सुमारे दोन लाख हेक्टर जमिनीला जैविक शेतीच्या अंतर्गत आणण्याचे उद्दिष्टे ठरविण्यात आलेले आहे.

- **प्रधानमंत्री किसान संपदा योजना**

या योजनेचा प्रारंभ ऑगस्ट 2017 मध्ये करण्यात आलेला आहे. या योजनेचा उद्देश म्हणजे आधुनिक पायाभुत संसाधानाच्या मदतीने कृषी क्षेत्रामध्ये विकास करण्यासाठी योग्य व्यवस्थापन आणि पायाभुत संरचनेची निर्मिती करणे हा आहे. यामुळे कृषी संदर्भातील साधने शेतकऱ्यांपर्यंत योग्य वेळेत पोंहचतील आणि त्यांचा शेतीमाल बाजारपेठेपर्यंत योग्य वेळेत पोहचल्यामुळे शेतीमालाला योग्य भाव मिळेल. या योजनेमुळे केवळ देशामध्ये खाद्यान्न क्षेत्राचाच विकास होईल असे नाही तर शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्ये वाढ होऊन त्यांच्या कल्पाणाचा मार्ग प्रशस्थ होईल. या योजनेमुळे ग्रामीण भागामध्ये रोजगाराच्या संधीमध्ये वाढ आणि अन्नधान्याच्या निर्यातीलाही प्रोत्साहन मिळू शकते.

- **राष्ट्रीय ई-शासन योजना : [National E-Governance Plan]**

या योजनेचा प्रारंभ 18 ऑगस्ट 2006 मध्ये करण्यात आलेला आहे. या योजनेचा उद्देश देशातील नागरिकांना सर्वच शासकीय सेवा इलेक्ट्रॉनिक साधनांच्या माध्यमातून उपलब्ध करून देणे हा आहे. ही योजना भारतीय शासनाच्या इलेक्ट्रॉनिक विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग आणि प्रशासकीय सुधारणा आणि जनतक्रार विभगाकडून बनविण्यात आलेली होती. कृषी क्षेत्रामध्ये राष्ट्रीय ई-शासन योजनेचा प्रारंभ 11 व्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या टप्यामध्ये सन 2010-11 मध्ये करण्यात आला. या योजनेचा उद्देश माहिती संप्रेषन तंत्रज्ञानाचा कृषी क्षेत्रामध्ये वापर करून कृषी विकासाला चालना देणे हा आहे. या योजनेच्या माध्यमातुन कृषी संदर्भातील माहिती शेतकऱ्यापर्यंत योग्य वेळी पोंहचविण्यात येत आहे. पुसा कृषी, कृषी विमा योजना, ई-बाजार, क्रॉप क्लिनिक, कृषी मित्र, किसान सुविधा, डिजीटल मंडी भारत, अॅग्री मार्केट, एकात्मिक किड व्यावस्थापन इत्यादी कृषी अॅप्समुळे शेतकऱ्यांना शेतमालाचे ऑनलाईन भाव पाहणे. हवामान अंदाज, धरणामधील पाणीसाठा, पिके घेण्याबाबत वळीराजाला हंगामानुसार तज्ञाचा सल्ला, किसान हमी भाव, कृषी विषयक सल्ला घेणे सहज सोपे झालेले आहे. हा एक कृषी क्षेत्रातील राष्ट्रीय ई - शासनाचाच प्रकार आहे.

- **राष्ट्रीय कृषी बाजार योजना [E-NAM (E National agriculture Market)]**

राष्ट्रीय कृषी बाजार योजनेला केंद्र शासनाने जुलै 2015मध्ये मंजुरी दिली आणि 14 एप्रिल 2016 पासून ही योजना कार्यान्वीत करण्यात आली. शेतकऱ्यांच्या शेती मालाला रास्त किंमत मिळवुन देणे आणि दलालांच्या भुमिकेला समाप्त करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक कृषी बाजारांची सुरूवात करण्यात आलेली आहे. या योजनेमुळे सर्व बाजार समित्या ई-ट्रेडिंग व्यासपीठावर आणण्यात आलेल्या आहेत. देशातील प्रमुख 585 कृषी बाजार समित्यां इंटरनेटने जोडण्यात आलेल्या आहेत यामुळे देशातील कोणत्याही भागात असणाऱ्या शेतकऱ्याला आपल्या मालाची विक्री रास्त किंमतीमध्ये करण्यास कोणताही आडथळा येत नाही. या योजनेची फायदे पुढील प्रमाणे सांगता येतात. ऑनलाईन व्यापार वाहतुक, प्रत्यक्ष वेळी किंमतीचा शोध, उत्पादकासाठी चांगल्या किंमती मिळणे, व्यावहारासाठी किंवा हास्तांतरनासाठीच्या खरीददारांच्या खर्चात कपात, स्थिर किंमत आणि ग्राहकांसाठी मालांची उपलब्धता, गुणवत्ता प्रमाणपत्र, गोदाम आणि रसद इत्यादीची उपलब्धता, अधिक कार्यक्षम पुरवठा साखळी शेतमाल विक्रीसाठी अनेक पर्याय खुले, शेतकरी व व्यापारी यांच्या मध्यस्थी साखळीला आळा इत्यादी फायदे आहेत. केंद्र शासनाने कृषी विकासासाठी पुढील अनेक योजनांचीही सुरूवात केलेली आहे. 1. कृषी उडान योजना (4 ऑगस्टे 2017), 2. राष्ट्रीय ठिकाऊ (सतत) कृषी मिशन, 3. भारतीय कृषी कौशल्य परिषद 4. आर्या (Attracting and Retaining youth in Agriculture) 5. पशु हाट पोर्टल (26 नोव्हेंबर 2016) 6. हरित क्रांती कृषीउन्नती योजना 7. कृषी मालाच्या आधारभूत किंमतीमध्ये वाढ इत्यादी.

**सारांश :**

कृषी क्षेत्राच्या विकासावर ग्रामीण क्षेत्राचा आणि भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास अवलंबून आहे. यामुळे केंद्र शासनाने कृषी क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य दिलेले आहे. कृषी आणि ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी अनेक योजना आखण्यात आलेल्या आहेत. या योजनांची कार्यक्षमपणे, कुशलतेने, प्रभावीपणे आणि पारदर्शकतेने प्रशासकीय यंत्रनेकडून अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. योजनेचे यश त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून असते. यामुळेच शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकारकडून ज्या योजना आखण्यात आलेल्या आहत त्यांची प्रामाणिकपणे प्रशासकीय यंत्रनेने अंमलबजावणी करावी. तसेच देशातील शेतकऱ्यांनी या योजनांचा प्रमाणीपकपणे फायदा घेण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. या योजनांची यशस्वीरित्या अंमलबजावनी झाल्यास भारत देश अन्नधान्य, दूध, फळे, भाजीपाला, मत्स्यपालन, कोंबडीपालन आणि पशुपालनाच्या क्षेत्रामध्ये आत्मनिर्भर तर होईलच परंतु अनेक कृषी उत्पादनांची निर्यात करून देशाच्या विकासाला चालना मिळेल.



Scanned with CamScanner

संदर्भ :-

१. K.N. Prasad, Indian Economy, Atlantic Publishers and distributors, New Delhi, 2003.
२. Jasbir Singh, S.S. Dhillion, Agricultural Geography, Tata Mcgraw-Hill Publishing Company limited, New Delhi.
३. सुरेंद्र त्यागी, पंचायती राज और ग्रामीण विकास, वंदना पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.
४. कुरूक्षेत्र - सप्टेंबर 2018.
५. कुरूक्षेत्र - मे 2018.
६. लोकराज्य - मे 2017
७. लोकराज्य - जून 2017
८. Agriculture in india wikipedia.



Scanned with CamScanner

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

18th Feb. 2019 Special Issue- 130 (I)

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

**Chief Editor**
**Dr. Dhanraj T. Dhangar**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
**Dr. Vanmala Govindrao Gundre**
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai, Dist. Beed.

**Co-Editor**
Dr. Ahilya Barure
Dr. D.R. Tandale
Dr. D.B. Tanduljekar

RESEARCH JOURNEY

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL
Vol. (I)
18 Feb. 2019 Special Issue- 130

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Dr. Vanmala Govindrao Gundre**
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

**Co-Editor**
**Dr. Ahilya Barure**
**Dr. D.R. Tandale**
**Dr. D.B. Tanduljekar**



Scanned with CamScanner

74. बालकांचे हक्क आणि आंतरराष्ट्रीय संघटना 199
**प्रा. वैशाली माधवराव दिवे**

75. मानवी हक्क : बालहक्क दृष्टिक्षेप 201
**प्रा. आर.बी.काळे**

76. नैतिकता के कटघेरें में दमतोड़ता मानवाधिकार 203
**प्रा.डॉ. अरविंद अंबादास घोडके**

77. मानवाधिकार आणि महिला सक्षमीकरण 205
**डॉ.सुरेखा सदाशिवराव शिंदे**

78. मानवी अधिकार आणि भारतीय राज्यघटना २०७
**प्रा.डॉ. जगदीश देशमुख**

79. मानव अधिकार व बालकामगार 210
**प्रा.सोनटक्के रमेश शंकरराव**

80. मानवी हक्कांचे स्वरुप 213
**डॉ.शिंदे एस.के.**

81. मानवी अधिकार आणि स्वंयसेवी संघटना 215
**डॉ. जाधव संजयकुमार हनुमंतराव**

82. भारतातील अन्न सुरक्षा कायदा व मानवी हक्क 217
**प्रा.बालासाहेब जोगदंड**

83. मानव अधिकार आणि महिला राजकारणः विशेष संदर्भ आमदार डॉ. विमलताई मुंदडा 219
**आलझेंडे रेखा दौलतराव**

84. भारतीय संविधानातील मानवाधिकार 222
**प्रा. डॉ. सांगळे बी.एस.**



Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (I) | January 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

# मानवी अधिकार आणि स्वंयसेवी संघटना

**डॉ. जाधव संजयकुमार हनुमंतराव**
लोकप्रशासन विभाग,यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

---

**प्रस्तावना**

मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी घ्हक्कड आवश्यक असतात. मानवाला परिपूर्ण व अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी जी परिस्थिती आवश्यक असते तो हक्कांमधून निर्माण होत असते. व्यक्तिमत्व, गुणवत्ता, सदसद्‌विवेकबुध्दी, कर्तव्यनिष्ठा, नितीमत्ता, बंधूभाव यासारख्यां गुणांचा विकास करण्यासाठी आणि चांगले जीवन जगण्यासाठी हक्क आवश्यक असतात. Human rights are essential for full development of human personality and for human happiness. They are indispensable for physical and mental upliftment of the human race.[1] व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक विकासाचा आधार घ्मानवी अधिकारड हेच असतात. भारतातील 1993 सालच्या मानवी अधिकार संरक्षण कायद्यानुसार मानवी अधिकाराची व्याख्या पुढील शब्दांत केलेली आहे. चमानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे मानवी जीवन, मानवी स्वातंत्र्य, मानवी समानता व मानवी प्रतिष्ठा यांच्याशी संबंधित असतात. तसेच रॅन्डमहाऊस विश्वकोषामध्ये मानवी अधिकाराची व्याख्या पुढील शब्दात केलेली आहे. चमानवी अधिकार म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तिला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक असतात.छ धर्म, लिंग, जात, वंश, देश यावर आधारित कोणताच भेद-भाव न करता सन्मानाने जगण्याचा व आपला विकास साधण्याचा प्रत्येक व्यक्तीचा हक्क म्हणजे मानवी अधिकार होय. न्याय व समता या मूल्यांना प्रमाण मानूण मानवाला काही मूलभूत अधिकार असले पाहिजेत. हा उदात्त विचार आज जगातील सर्वच राष्ट्रांनी मान्य केलेला आहे.

**संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी अधिकार**

जगातील प्रत्येक व्यक्तीला मानवी अधिकाराची प्राप्ती होणे गरजेचे आहे. तसेच या अधिकारांना राज्याच्या कायद्याने संरक्षण मिळणे अनिवार्य झाले आहे. यामुळेच लोकशाही देशांच्या ध्येय-धोरणांत मानवी अधिकाराच्या प्रस्थापणेला मध्यबिंदू मानलेले आहे. चसंयुक्त राष्ट्रसंघाने याबाबत पुढाकार घेऊन 1948 साली मानवी क्रुरतेला आळा घालण्यासाठी मानवी हक्काचा सार्वभौमिक जाहीरनामाड (Universal Declaration of Human Rights) प्रकाशित करून मानवी हक्कांच्या संरक्षणाच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले. जगातील अनेक राष्ट्रांनी मानवी हक्कांचा समावेश राज्यघटनेमध्ये करून त्यांचे संवर्धन व संरक्षण केलेले आहे.

**भारतीय राज्यघटना आणि मानवी अधिकार**

नागरिकांच्या हक्कांना संरक्षण मिळाल्याशिवाय लोकशाही व्यवस्थेला बळकटी येऊ शकत नाही याची घटनांकाराना पुरेपूर जाणीव होती. यामुळेच घटनाकारांनी राज्यघटनेमध्ये मानवी हक्कांचा समावेश केलेला आहे. चThe Indian constitution captures of human rights in its Preamble and the sections on fundamental rights and the directive principles of state policy.छ[3] भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका, मूलभूत अधिकार आणि राज्य धोरणांची मार्गदर्शकतत्वे यामध्ये मानवी हक्कांचे प्रतिबिंब पडलेले आहे. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम 12 ते 35 मध्ये मूलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच त्यांना न्यायालयीन संरक्षण दिलेले आहे.

**मानवी अधिकाराच्या क्षेत्रामध्ये कार्यरत स्वंयसेवी संघटना**

मानवी हक्कांचे किंवा अधिकारांचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर विविध स्वंयसेवी संघटना कार्यरत आहेत. ॲमनेस्टी इंटरनॅशनल, ॲन्टी-स्लव्हरी इंटरनॅशनल, कल्चरल सर्व्हाव्हल, फूड फर्स्ट इन्फॉरमेशन ॲन्ड ॲक्शन नेटवर्क, ह्युमन राईट वॉच इत्यादी आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या प्रमुख स्वेच्छिक संघटना आहेत. भारतामध्ये मानव अधिकाराच्या क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या प्रमुख स्वंयसेवी संघटना, फ्रोडम फर्म, जस्टीस ऑन ट्रायल, मानव अधिकार संग्राम समिती, पीपल्स वॉच इत्यादी आहेत. महाराष्ट्रामध्ये सेहत (CEHAT), प्रयास, मानव्य, आनंदवन, सर्च इत्यादी स्वंयसेवी संघटना मानवी हक्काच्या क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत.

**स्वंयसेवी किंवा गैरसरकारी संघटनेचा अर्थ**

शासनाचे आदेश किंवा इच्छेशिवाय एखादी संघटना निर्माण केली जाते त्या संघटनेला घ्स्वंयसेवी संघटनाड असे म्हणतात. या संघटना स्वायत्त, अधिकारशाही - हीन, शासकीय नियंत्रण मुक्त, स्वेइच्छेने कार्यरत आणि मानवी सेवेला वृत माणनाऱ्या असतात. डेव्हिड एल. सिल्स यांच्या मते, स्वेच्छिक संघटना हो अशा सदस्यांचा समूह आहे, जो निश्चित अशा उद्देशांच्या प्राप्तीसाठी स्वेइच्छेने संघटीत होतो आणि राज्याच्या नियंत्रणाशिवाय कार्य करतो.[4] स्वंयसेवी संघटना स्वंयप्रेरणेतून काही व्यक्तीकडून निर्माण केल्या जातात. समाजातील व्यक्तींना घ्मानवी सेवाड पुरविणे आणि सामाजिक विकास करणे हे त्यांचे ध्येय असते.

**मानवी अधिकाराच्या संवर्धन आणि संरक्षणामधील स्वंयसेवी संघटनाची भूमिका**

स्वंयसेवी संघटना जनकल्याणाच्या विविध क्षेत्रामध्ये कार्य करून मानवी अधिकाराचे संवर्धन आणि संरक्षण करीत आहेत. नव आर्थिक धोरणाच्या काळात राज्यसंस्थेला पार पाडावी लागणारी जनकल्याणाची भूमिकाही मोठ्या प्रमाणावर स्वंयसेवी संघटनावर येऊन पडलेली आहे. यामुळेच संयुक्त राष्ट्राचे माजी महासचिव कोफी अन्नान म्हणतात की, The 21st century will be an era of NGOs. समाजातील मानवी अधिकाराच्या उल्लघटनांच्या घटनांचा शोध घेऊन त्यातील पीडितांना न्याय मिळवून देण्याच्या कार्यात स्वंयसेवी संस्था पुढाकार घेतात. चHuman rights non-governmental organizations (NGOs) are often among the first to reach the sence of massive violations of human rights and humanitarian lawछ.[5] स्वंयसेवी संघटना समाजातील उपेक्षित वर्ग आणि सामाजिक, शारीरिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या मानवी अधिकाराचे संवर्धन व रक्षण करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावतात.

- जनकल्याण, सामाजिक न्याय, समानता प्रस्थापित करण्यासाठी शासनाकडून तयार करण्यात आलेली धोरणे, कार्यक्रम जनतेपर्यंत पोंहचविण्यामध्ये स्वंयसेवी संघटनांची भूमिका महत्वाची असते. अनुसूचित जाती व जमाती, अल्पसंख्याकांच्या हिताचे रक्षण, महिला व बाल



Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452, (GIF) - 0.676 Special Issue – 130 (I) | January 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

विकास, बालश्रमिकांचा उध्दार, अस्पृश्यता निवारण इत्यादी क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करून मानवी अधिकाराचे संरक्षण व संवर्धन स्वंयसेवी संघटना करतात.

- स्वंयसेवी संघटनेकडून राज्य, देश व जागतिक स्तरावर मानवी अधिकाराबाबत जनजागृती घडवून आणण्याच्या संदर्भात प्रशंसनीय कार्य केले जात आहे. ग्रामीण, दुर्गम व आदिवासी क्षेत्रातील जनतेमध्येही मानवी अधिकाराबाबत जाणीव-जागृती घडवून आणण्याच्या कार्यात स्वंयसेवी संघटना महत्वाची भूमिका बजावीत आहेत.
- जनहित याचिकांच्या (Public Interest Litigation) माध्यमातून स्वंयसेवी संघटना न्यायालयासमोर मानवी अधिकाराच्या उल्लंघनासंदर्भातील वाद दाखल करतात. न्यायालय त्या वादाचा न्याय-निवाडा करून संबंधित व्यक्तींच्या मानवी अधिकाराचे रक्षण करतात.
- आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर मानवी अधिकराचे मानक स्तर निश्चित करण्यामध्ये स्वंयसेवी संघटनाची भूमिका महत्वाची आहे. युनो (UN) च्या मानवी अधिकार आयोगामध्ये मानवी अधिकार परिषदेकडून मानक निश्चित करतेवेळी विश्व स्तरावरील स्वंयसेवी संघटनाशी विचार-विनिमय केला जातो.[6]
- समाजातील अनिष्ठ, रूढी, प्रथा व परंपराचे निमुर्लन करण्यासाठी शासनाकडून अनेक सामाजिक कायदे बनवली जातात. त्या कायद्याबाबत जनमाणसामध्ये विश्वास निर्माण करून या अनिष्ठ रूढी व परंपराना समाप्त करण्यामध्ये स्वंयसेवी संघटना महत्वाची भूमिका बजावतात. तसेच या संघटनाकडून मानवी अधिकाराच्या संरक्षणासाठी नवीन कायदा करण्यासाठी शासनावर दबाव टाकला जातो. हेराल्ड लास्कीच्या मते, राज्य हक्कांची निर्मिती करत नाही तर केवळ हक्कांना मान्यता देते. कायदा हक्क निर्माण करत नाही, तर केवळ हक्कांचे रक्षण करतो.छ मानवी अधिकाराचे रक्षण करण्यासाठी शासनाने कायदे बनवली पाहिजेत व त्या माध्यमातून मानवी अधिकाराचे जतन केले पाहिजे.
- सामाजिक व्यवस्थेमध्ये नियमितपणे परिवर्तन होत असते. या परिवर्तनाबरोबर सामाजिक मूल्य, प्रतिमान, जीवनशैली आणि आचरण सुध्दा प्रभावित होत असते. या सामाजिक परिवर्तनाला एक निश्चित अशी गती आणि सकारात्मक दिशा देण्यामध्ये स्वंयसेवी संघटना निर्णायक भूमिका बजावतात. समाजामध्ये असलेली जातीव्यवस्था, सांप्रदायिकतेची समस्या, स्त्री-पुरूष असमानता इत्यादीचे समूळ उच्चाटन करून स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यावर आधारित नवीन व्यवस्था निर्माण करण्यामध्ये स्वंयसेवी संघटना महत्वाची भूमिका बजावतात.
- समाजातील शोषित, उपेक्षित आणि दुर्बल घटक आपल्या मानवी अधिकाराचे रक्षण करण्यासाठी स्वतः सक्षम आणि संघटित नसतात. अशा समुहाच्या मानवी हक्काच्या उल्लंघनाच्या प्रश्नांचा शोध घेऊन, त्याची सोडवणूक करण्यासाठी संबंधिताना कायदेशीर, वित्तीय साह्यता उपलब्ध करून देतात. तसेच त्यांची प्रकरणे न्यायालयात दाखल करून पीडितांना न्याय उपलब्ध करून देतात.
- स्वंयसेवी संघटना जनता आणि शासन यांच्यातील दुवा म्हणून कार्य करतात. या संघटना जनतेच्या मानवी हक्कासंदर्भातील गरजा आणि अपेक्षांची माहिती शासनाला देतात आणि शासनाने मानवी हक्कांच्या रक्षणातील केलेली कायदे आणि उपाययोजना याची माहिती जनसामान्यांना करून देतात. या माध्यमातून स्वंयसेवी संघटना मानवी अधिकाराबाबत शासनाला सजग आणि जनतेला जागृत करतात.

**निष्कर्ष**

स्वंयसेवी संघटनाकडून मानवी अधिकाराच्या संवर्धन आणि रक्षणासंदर्भात उल्लेखनिय कार्य केले जात आहे. अशा संघटनाना शासनाने प्रोत्साहन देण्याचे कार्य केले पाहिजे. देशातील मानवी अधिकाराच्या उल्लंघनाची प्रकरणे शोधणे आणि त्यांचे निराकरण करून देण्याच्या कार्यामध्ये शासनाने स्वंयसेवी संघटनांची मदत घेतली पाहिजे. जनसमुहाच्या मानवी अधिकाराचे उल्लंघन होऊ नये म्हणून काय प्रतिबंधात्मक उपाय योजना केल्या पाहिजेत याविषयी शासनाने स्वंयसेवी संघटना सोबत विचारविनिमय करून आदर्श स्वरूपाची धोरणे आखली पाहिजेत आणि त्यांची परिणामकारकपणे अंमलबजावणी केली पाहिजे. स्वंयसेवी संघटनानी मानवी अधिकाराचे रक्षण करण्याच्या नावाखाली शासनाच्या राष्ट्रविकासाच्या कार्यामध्ये खोडा घालण्याचे काम करू नये. देशाच्या संरक्षणासंदर्भातील कार्यामध्ये दखल देऊ नये. प्रसिध्दी व लोकप्रियता मिळविण्यासाठी स्वंयसेवी संघटनांनी नक्षलवाद आणि दहशतवाद विरोधी कार्यवाह्यांचा विरोध करू नये. या संघटनांनी आपले कार्य भ्रष्टाचाराला थारा न देता नैतिकता व पारदर्शकपणे केली पाहिजेत. शासनाकडून स्वंयसेवी संघटनाच्या कार्याचे पर्यवेक्षण करण्याची व्यवस्था केली पाहिजे. यामुळे या संघटनावरील जनतेचा विश्वास अबाधित राहिल आणि संघटना आपले कार्य निष्ठेने पूर्ण करून मानवी विकासाच्या कार्यात महत्वाचे योगदान देऊ शकतील.

**संदर्भग्रंथ सूची**

१. Rachana Suchinmayee, Gender, Human Rights and Environment, Atlantic Publishers, Delhi, P. 78
२. कुलकर्णी पी.के., मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ.2
३. Rachana Suchinmayee, Op.Cit., P. 101.
४. कटारिया सुरेन्द्र, सामाजिक प्रशासन, आर.बी.एस.ए पब्लिशर्स, जयपूर, पृ. 321.
५. M.V. Raju, Human Rights Today and Tomorrow, Swastik Publication, Delhi, P. 1.
६. प्रतियोगिता दर्पण, हिंदी मासिक, मे 2015, पृ. 97



Scanned with CamScanner